# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा दिनांक २०.२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी २००७ रोजी मा.महापौर श्री.डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे दुपारी ११.३० वाजता ''वंदेमातरम्'' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१३. स.स.सौ.लक्ष्मी आशन्ना शंकर
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.इंगळे शकुंतला सांडुजी
२३. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद

२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३२. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३३. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३४. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३५. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३६. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३७. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्यीन
३८. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३९. स.स.श्री.खान निसार मो.खान
४०. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४१. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४२. स.स.सौ.मुमताज बेगम वाहेद खान
४३. स.स.सौ.राऊत छाया विलास
४४. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४७. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४८. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४९. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
५०. स.स.श्री.मोतीवाला अश्रफ महंम्मद युनूस
५१. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५२. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५३. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५४. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५५. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५६. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५७. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५८. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५९. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६०. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६१. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६२. स.स.श्री.खुडे विजय किसन
६३. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६४. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६५. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम

६६. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६७. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
६८. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६९. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७०. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७१. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७२. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७३. स.स.सौ.जाधव संगिता विठ्ठलराव
७४. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७५. स.स.श्री.निमगावकर प्रल्हाद गणपतराव
७६. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७८. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८०. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८१. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८२. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
८३. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८४. स.स.श्री.बारवाल गजानन
८५. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८६. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.संजय जोशी : सध्या शहरात पाण्याचा बिकट प्रश्न भेडवासत आहे. काल जी पाईप लाईन फुटली त्याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.अ.साजेद : मनपा पोटनिवडणूकीत एक नविन सदस्य निवडून आलेले आहेत त्यांचा सत्कार करावा.

मा.महापौर : काल शहरात पाणीपुरवठा करणारी १४०० एम.एम.ची जलवाहिनी परत फुटल्यामुळे शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : नक्षत्रवाडी येथून शहरात पाणी पुरवठा करणारी लाईन ही पी.एस सी ची आहे. त्यामुळे या एरियात नेहमी प्रॉब्लेम येतो.

श्री.संजय जोशी : १९९८ मध्ये ही पाईपलाईन मनपाने हँडओव्हर करून घेतली.१९९८ पर्यंत ही लाईन पन्नासवेळा फुटली तरीही त्या परिस्थितीत ती लाईन मनपाने हँडओव्हर करून घेतली. याचे खापर नगरसेवकांवर फुटत आहे. लाईन हँडओव्हर करून घेताना टेक्नीकल बाबी तपासुन घेतल्या नाहीत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रॉब्लेम येत आहेत ७०० एम.एम.च्या व्यासाच्या पाईप लाईनचे आयुष्य संपलेले आहे. १४०० एम.एम.ची लाईन पीएसची आहे. त्यामुळे फुटते. १९९२ चाच पाणीपुरवठा आजही शहरात होत आहे. प्रशासनाने शहराची पाण्याची वाढती गरज लक्षात घेतलेली नाही. हा प्रशासनाचा नाकर्तेपणा आहे. वाढती लोकसंख्या प्रशासनाने लक्षात घेतली नाही. ही लाईन ताब्यात घेतली तेव्हापासुन आजपर्यंत ही लाईन किती वेळा फुटली याची माहिती द्यावी. जुनीच जलवाहिनी कशी हस्तांतर करून घेतली.

श्री.अ.साजेद : आतापर्यंत २१३ वेळा पाण्याची लाईन फुटलेली आहे. तिच्या दुरूस्तीसाठी आतापर्यंत किती खर्च आला त्याची माहिती द्यावी. लाईन फुटल्यामुळे त्या भागातील नागरीकांचे शेतकऱ्यांचे नेहमी नुकसान होते. ज्यांचे नुकसान झाले त्यांना भरपाई द्यावयास हवी.

श्री.विनायक पांडे : शहरात सध्या लग्नसराई सुरू आहे.स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी विचारलेला प्रश्न जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. टेक्नीकल माहित असतानाही पाईप लाईनच्या दुरूस्तीसाठी प्रयत्न केले जात नाहीत. मागील १५ वर्षात एक एमएलडी पाणी वाढवण्याचा प्रयत्न झालेला नाही. यापुढे तरी आपले काय प्रयत्न राहणार आहेत याचा सर्वतोपरी विचार होणे आवश्यक आहे.

श्री.माळवतकर : आपण जनतेकडून १८०० रू.पाणीपट्टी घेतो. आपण एक दिवसाआड पाणी पुरवठा करतो. एक दिवसाआड पाणी देतानाही सिडको,हडको भागात ४५ मिनिटे ते १ तासपर्यंत पाणी दिले जाते. मात्र शहरातील काही भागांना दररोज पाणीपुरवठा होतो.सिडको,हडको मध्ये काही ठिकाणी३-३ ते ४-४ दिवस पाणी मिळत नाही. तर शहरात काही ठिकाणी ३ ते ४ तास पाणी मिळते. सिडको ,हडकोत पुरेसे पाणी मिळत नाही म्हणून पाणीपट्टी अर्धे करावी. शहरातील सर्व भागास समान पाणी यावयास हवे.सिडकोला वेगळे समजु नका भेदभाव करू नका.

श्री.संजय शिरसाठ : श्री.माळवतकर यांनी मांडलेला मुद्दा महत्वाचा आहे.सिडको,हडकोस आपण एक दिवसाआड पाणी पुरवठा करतो. त्यांना अर्धे पाणीपट्टी करण्यात यावी.

श्री.संजय जोशी : शासनाने पाणी पुरवठ्यासाठी ६७ कोटी रूपये अनुदान मंजुर केले होते. त्यापैकी २५ कोटीची कामे झालेली आहेत. तरीही शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ झालेली नाही. २५ कोटी व्याज भरतो याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : १९९२ नंतर पाणी वाढवण्यासाठी काही प्रयत्न केलेले आहेत काय. पाईप लाईन हस्तांतरण करून घेतांना टेक्नीकली ती पाहिली होती का पाणी पुरवठा मध्ये काही प्रमाणात वाढ झाली का याचा शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : ६७ कोटीच्या योजनेमधुन २५ कोटी रूपयाचे काम एमजीपी कडून करून घेतलेले आहे. २५ कोटीमधुन सिडकोस पाईप लाईन दिलेली आहे. तसेच

टाक्याही बांधलेल्या आहेत. सिडकोस एक्सप्रेस लाईन मधुन पाणी देण्यात येत आहे. ही योजना पुर्ण झालेली नाही. ६७ कोटीमधून २५ कोटीचा खर्च झालेला आहे. ६५ एमएलडी वाढणार होते योजना पुर्ण झाली नाही त्यामुळे १५-१६ एमएलडी पाणी वाढले आहे.

श्री.संजय जोशी : ६७ कोटीच्या योजनेमुळे पाण्यात कोणतीही वाढ झालेली नाही. २५ कोटीमध्ये प्रथमत: पाईप लाईन न टाकता, पंप न बसवता प्रथम टाक्या बांधल्या. प्रशासनाने २५ कोटी खर्च करून काय केले ही बाब जनतेस कळू द्या. ६७ कोटीची मागणी करत असताना त्याऐवजी १०० कोटीची मागणी करावयास हवी. प्रशासनाच्या नाकर्तेमुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

मा.महापौर : किती टाक्या बांधल्या त्यात पाणी आहे काय?

शहर अभियंता : ६७ कोटीमधून ज्या टाक्या बांधल्या त्यातुन आपण पाणी देत नाही.

श्री.संजय जोशी : प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे २५ कोटी रूपये पाण्यात गेले. जनतेचा गैरसमज झालेला आहे की, नगरसेवक काम करत नाहीत. २५ कोटी खर्च करून प्रशासनाने काय काम केले लाईन फुटली तर सकाळी ६=०० पासुन प्रत्येक नगर सेवकाच्या घरी फोन येतात.

श्री.संतोष खेंडके : प्रशासनाने प्रथम केवळ टाक्या बांधल्या पण पाणी दिले नाही. पुंडलिकनगर मध्ये १५ वर्षापासुन पाण्याचा प्रश्न आहे. काहीजण टँकर खाली मेलेले आहेत. प्रशासनाने कबुल केल्यानुसार पुंडलिकनगर भागास पाणी पुरवठा केला नाही तर मी स्वत: पुंडलिकनगरच्या टाकीवरून आत्महत्या करेन.

श्रीमती खान मेहेरून्नीसा : आजच्या बैठकीस उप आयुक्त,आयुक्त का उपस्थित नाहीत याचा खुलासा व्हावा. अधिकारी नाहीत सभा तहकुब करावी.

मा.महापौर : अर्ध्या तासासाठी सभा तहकुबि करण्यात येत आहे.(वेळ १२.३० वाजता) १२.३० वाजता तहकुब झालेली सभा दुपारी १.४५ वाजता परत मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्रीमती मुमताज बेगम या मनपा पोटनिवडणुकीत पालिका सदस्य म्हणून निवडून आल्याने मा.महापौर, मा.उप महापौर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

श्री.काशिनाथ कोकाटे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी विभाग प्रमुख डॉ.यु.म.पठाण यांना भारत सरकारने 'पद्मश्री'हा पुरस्कार बहाल करून गौरव केला आहे. डॉ.पठाण हे संत साहित्याचे ज्येष्ठ व गाढे अभ्यासक आहेत. ते या ऐतिहासीक शहराचे ज्येष्ठ नागरीक आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेपासुन ते या शहरात आहेत. तेमुळचे सोलापुरचे रहिवासी असले तरी संतांच्या पावन भूमीमध्ये आल्यानंतर त्यांनी मराठीतून पुरातन साहित्याचा अभ्यास केला व आपल्या शहराचा नावलौकीक केला. त्यांच्या अभिनंदनाचा ठराव घ्यावा व मनपाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करावा.

श्री.रशिद खान मामु,
श्री मनमोहनसिंग ओबेरॉय } यास आमचे अनुमोदन आहे.
श्री.संतोष खेंडके

श्री.रशिद खान (मामु) : याच बरोबर श्रीमती झकेरीया मॅडम यांचाही सत्कार करावा.

मा.महापौर : या शहरातून डॉ.यु.म.पठाण व झकेरीया मॅडम यांनाच'पद्मश्री'हा पुरस्कार देण्यात आलेला आहे. या दोघांचाही सत्कार महानगरपालिकेतर्फे करण्यात येईल.

श्री.संजय जोशी : ६७ कोटीच्या योजनेचे प्रशासन उत्तर देऊ शकलेले नाही. ७०० एम.एमच्या लाईनचेही आयुष्य संपलेले आहे. यामुळे पाणी पुरवठा सुरळित व्हावा यासाठी आपण काय उपाय करणार आहोत. दर चार दिवसांनी पाणीपुरवठा खंडीत होत आहे. यास नगरसेवकांना उत्तर द्यावे लागते. दोन्ही लाईन एकाचवेळी फुटल्यानंतर आपण काय करणार आहोत.

श्री.संजय शिरसाठ : बीडकीन जवळ ७०० ची लाईन आज फुटलेली आहे.याचे आपण काय करणार आहोत.

श्री.अ.साजेद : या पाईप लाईन्सची २१३ वेळा दुरूस्ती झालेली आहे.

शहर अभियंता : १४०० एम.एम.ची लाईन काल फुटली आज तीचे काम पुर्ण होईल. ७०० एम.एम.च्या लाईनला ३० वर्षे पुर्ण झालेली आहेत. १९९८ मध्ये १२०० एम.एम.ची लाईन एमजीपे कडून टाकण्यात आलेली आहे. १९९८ मध्ये ही लाईन मनपाकडे हस्तांतरीत झाली. या लाईनमधुन १६५ एमएल पाणी घेता येत होते. घेता येत आले असते तर शहराची पाण्याची गरज भागली असती.

श्री.संजय जोशी : सदरची लाईन हस्तांतरीत करून घेत असतांना आपण या गोष्टीची खात्री करून घेतली होती का? जर एवढे पाणी मिळणार नसेल तर आपण ती हँडओव्हर का करून घेतली. डोळे झाकुन कार्यवाही केली करारनामा काय आहे.

शहर अभियंता : १०० एमएलडी पाणी या स्कीममधुन एमजीपे देणार होते. त्याच स्कीममधून भविश्यात १६५ एमएलही पाणी देण्यात येणार होते.फारोळा येथे वाटर पंप व ॲडीशनल मशीनरी बसविली असती तर १६५ एमएलछी पाणी मिळाले असते.

श्री.काशिनाथ कोकाटे : एमजीपे कडून लाईन हँडओव्हर करून घेतांना तिची पडताळणी केलेली दिसुन येत नाही.६७ कोटीच्या पाईपची कॅपेसिटी कमी आहे. ६७ कोटीची योजना राबवत असतांना शहरात पाईप लाईनचे जाळे पसरावयास हवे होते. या कामावर मनपाचे नियंत्रण राहिले नाही. टेक्नीकली ही लाईन पडताळणी केली नाही त्यामुळे या लाईनमधुन आवश्यक तेवढे पाणी भेटू शकत नाही. मनपाने पाईपचे प्रकार बदललेले आहेत. एसी लाईन टाकण्यासाठी शासनाची परवानगी नाही. शहरातील पाणी पुरवठ्याचे नियोजनच मुळात बरोबर नाही. शहरात अनेक भागात पाईप लाईन टाकलेली आहेत. परंतु ती कार्यान्वीत झालेली नाही. प्रशासनाने गती घेतली असती तर समांतर जलवाहिनीचे नारळ फुटले असते. १०००/- रू.न भरणाऱ्या नागरीकाचे नळ कनेक्शन आपण कट करतो. ६७ कोटीचा बट्याबोळ होण्यासाठी प्रशासन जबाबदार आहे. समांतर जलवाहिनी शिवाय पर्याय नाही. सर्व योजना बंद करून आपल्या निधितुन हे काम करा. पाणीच नाही तर नुसत्या

जलवाहिन्या कशासाठी टाकता. पाण्याचे नियोजन करा पाण्याचे ऑडीट झालेले नाही. ऑडीटच झालेले नाही तर येणारे पाणी व वितरीत झालेले पाणी याचा ताळमेळ कसा घालणार. पाण्याचे ऑडीट झाले तर पीतळ उघडे पडोत. शहरात किमान एक तास पाणी देता येईल. याचे नियोजन करा. कोण अधिकारी दोषी आहेत. याची संचिकेत नोंद आहे. त्याच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : गेल्या दोन वर्षापासुन पाण्याचा प्रश्न चर्चीला जात आहे. प्रत्येक वेळेस पाईप लाईन फुटली की दोन-चार दिवस पाणी येत नाही. असे सांगण्यात येते त्यामुळे नगरसेवकांना नागरिकांच्या शिव्या खाव्या लागतात. समांतर जलवाहिनी मंजुर झालेली आहे. परंतु ती क्लीअर झालेली नाही. काही वार्डामधुन २ वेळा पाणी दिले जाते. वेदांतनगर मध्ये २ वेळा पाणी पुरवठा होतो. काही वार्डात तिसऱ्या दिवशी पाणी दिले जाते. असे प्रकार यापुढे होऊ नये पाण्याचे नियोजन करावे.

सौ.संगिता जाधव : पुंडलिक नगर पाणी पुरवठ्याचा प्रश्न केव्हा सुटणार आहे. गुंठेवारीमध्ये मालमत्ता कर भरण्याचे सांगण्यात येते. माझ्या वार्डातील लोकांनी कर भरूनही पाणी पुरवठा होत नाही. पाणी पुरवठा झाला नाही तर मी सभागृहात विष घेतल्याशिवाय राहणार नाही. संगिता जाधव बोलत नाही करून दाखवते ८० टक्के लोकांनी पैसे भरलेले आहेत.

श्री.काशिनाथ कोकाटे : एका नागरीकाने पैसे भरले तरी आपण पाणी देणार होतो.

मा.महापौर : या सभेमध्ये पुंडलिक नगरच्या पाणी पुरवठ्याचा प्रस्ताव आहे. तो प्रस्ताव वाचुन दाखवला आहे. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. पुंडलिक नगरला पाणी देण्यात यावे.

श्री.संजय शिरसाठ : ज्या सोसायट्यांनी बेटरमेंट, डेव्हलपमेंट चार्जेस भरलेले आहेत. त्यांना आपण पाणी देऊ शकत नाही. देशमुख नगर सारख्या भागास आपण बेटरमेंट चार्जेस भरलेले असतानाही पाणी देऊ शकत नाही.

श्री.संजय जोशी : पुंडलिक नगर भागास पाणी देण्यास कोणाचाही विरोध नाही. परंतु ज्यांची २०-२० वर्षापुर्वी बेटरमेंट व डेव्हलपमेंट चार्जेस भरलेले आहेत त्यांना आपण कधी पाणी देणार देशमुख नगर, मुस्तफाबाद, कृष्ण नगर या एरीयातील लोकांनी बेटरमेंट व डेव्हलपमेंट चार्जेस भरल्या नंतरही आपण त्यांना पाणी देऊ शकत नाही. या भागास कधी पाणी देणार.

मा.महापौर : ज्या कॉलनीजनी बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत परंतु तेथे पाणी पुरवठा होत नाही त्याबाबत मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : शहरात सद्य स्थितीत ७०% लोकांना पाणी मिळते. ३०% लोकांना पाणी मिळत नाही. त्यात गुंठेवारी व इन्लीगल सोसायटीज आहेत.१९९९ मध्ये ६७ कोटीची स्कीम एमजीपी मार्फत राबविण्यात आली होती. त्यात असा समज होता की शहरास या योजनेतुन १६५ एमएलडी पाणी मिळेल व ते २०११ पर्यंत शहरास पुरेल. आहे त्याच लाईन मधुन जास्त स्पीडने पाणी टाकुन १६५ एमएलडी पाणी पुरवठा करता येईल. असा एमजीपीचा अंदाज होता त्यांनी स्वत:चे नॉर्मस बदलले, एमजेपीने स्वत:चे नॉर्मस बदलले १.६६ च्या स्पीडने पाणी न येता १.२२ च्या

स्पीडने पाणी आले तरी १२-१४ एमएलडी पाणी जास्तीचे मिळू शकते. परंतु हे पाणी पुरेसे नाही. यापैकी ६ एमएलडी पाणी गुंठेवारी भागास देण्यात येईल. परंतु जे गुंठेवारात घरे नियमीत करून देतील त्यांनाच पाणी देण्यात येईल. केवळ समांतर जलवाहिनी झाल्यानंतरच शहराचा पाणी पुरवठा वाढू शकतो. ६ एमएलडी पाणी ज्या भागांनी १०-१५ वर्षापुर्वी बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत त्यांना देण्यात येईल. पुंडलिक नगर बाबत मी पुर्वीच सांगितले होते की, जर इतर भागांनी गुंठेवारी प्रथम पुर्ण केली तर त्या भागास प्रथम पाणी देण्यात येईल. व मग पुंडनिक नगर भागास पाणी राहणार नाही. लीकेजेस बंद झाल्यामुळे थोडे बहुत पाणी वाढू शकते. आपण टेंडर काढलेले आहे. तीन एजन्सीजचे इनव्हलोप ओपन केलेले आहेत. टेक्नीकल स्कूटीनी इंजीनियरींग कॉलेजकडून करण्यात येत आहे. एखाद्या आठवड्यात हे काम संपेल टेक्नीकली जे योग्य असतील त्यांचे इनव्हलोप उघडण्यात येईल. त्यानंतर जी.बी. समोर प्रस्ताव ठेवण्यात येईल. पुंडलिक नगर मध्ये जर ८०% लोकांनी पैसे भरले असतील तर त्यांना ३/४ दिवसात पाणी देण्यात येईल.

श्री.संजय शिरसाठ : ज्यांनी १५-२० वर्षापुर्वी बेटरमेंट व डेव्हलपमेंट चार्जेस भरले आहेत त्यांना आपण केव्हा पाणी देणार. सभागृहात भेदभाव करू नका.

श्री.संजय जोशी : गुंठेवारीत पैसे भरणाऱ्यांना जर तुम्ही ३ दिवसात पाणी देणार असाल तर बेटरमेंट व डेव्हलपमेंट चार्जेस भरणारांचे काय त्यांना का पाणी दिले जात नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : वाढीव १२ एमएलडी पाणी आपण नेमके कोणत्या भागास देणार याचे आपणाकडे काही नियोजन आहे काय. आयुक्त स्वत:चा शब्द फिरवत आहेत.

श्री.अ.साजेद : गुंठेवारीची वेळ का यावी. अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन अनधिकृत वसाहती होऊ दिल्या. पिण्यास पाणी मिळत नाही ही चुक कोणाची पाणी पुरवठा करता येत नसेल तर बेटरमेंट चार्जेस कशासाठी घेतले.

मा.आयुक्त : जे १०-१२ एमएलडी पाणी वाढत आहे. त्यापैकी ५०%पाणी ज्या सोसायट्यांनी बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत त्यांना द्यावयास हवे. गुंठेवारी भागात ६ एमएलडी पेक्षा जास्त पाण्याची गरज आहे. परंतु जास्तीचे पाणी नसल्याने जो सर्वप्रथम गुंठेवारीत येईल त्यास प्रथम पाणी दिले जाईल.

श्री.संजय शिरसाठ : ज्या सोसायट्यांनी १५-२० वर्षापुर्वीच पैसे भरलेले आहेत त्यांना प्रशासनाने पाणी द्यावयास हवे. त्यासाठी आमच्या मान्यतेची गरजच काय.

मा.महापौर : सर्व सोसायट्यांना देण्यासाठी २० एमएलडी पाण्याची आवश्यक्ता आहे. तेवढे पाणी आपल्याकडे उपलब्ध नाही.

श्री.संजय शिरसाठ : सिडको भागाची पाण्याची मागणी होती. तेव्हा आपण सव्वा पाच कोटी रूपये खर्च करून एक्सप्रेस लाईन टाकली. त्याची एमजीपेला २२ टक्के सर्वीस चार्ज म्हणजेच सव्वा कोटी रूपये दिले. त्यावेळी सिडकोस २२ एमएलडी पाणी ऐवजी २६-२७ एमएलडी पाणी सप्लाय होईल असे सांगण्यात आले होते. परंतु आजही सिडकोस २२ एमएलडी पाणी मिळते. पुंडलिकनगर मध्ये लोक रांगा लावुन पैसे भरत आहेत. तीन दिवसात त्यांना पाणी दिले नाही तर ती जबाबदारी कोणाची असेल.

श्री.रशिद खान (मामु) : आपण ठराव पारीत केलेला आहे. परंतु आपण पाणी देऊ शकणार आहोत का. आपण पाणी देऊ असे खोटे का बोलत आहोत.

श्री.काशिनाथ कोकाटे : आपण पाण्यावरून नगर सेवकांमध्ये दोन गट पाडणे हे बरोबर नाही. आपल्या अधिकाऱ्यांना पाणी पुरवठा लाईन्सच्या नकाशांची तरी पुर्ण माहिती आहे का. आम्ही केलेले नियोजन तुम्ही मानणार आहात का. बिल्डरने मागणी करताच त्यास पाणी दिले जाते. परंतु देशमुख नगरला पाणी दिले जात नाही.

श्री.भगवान घडमोडे : प्रशासनाकडे काही नियोजन आहे काय? मा.आयुक्तांनी सांगितले तुम्ही नियोजन करा. आम्ही नियोजन केले तर तुम्ही ते मानणार आहात का? त्याची अंमलबजावणी करणार आहात का?

मा.महापौरांच्या आसनासमोर अनेक नगर सेवक एकत्र जमुन बोलत होते. राजदंड ओढतात.

श्री.वसंत नरवडे पाटील : सर्व नगर सेवकांना बोलण्यासाठी वेळ द्या.

मा.महापौर : नगर सेवक श्री.रशीद मामु यांचे सभासदत्व रद्द करण्यात येते. त्यांनी सभागृहा बाहेर जावे त्यांनी असे वर्तन करू नये.

श्री.अ.रशिद (मामू) : सर्वांना बोलायची संधी द्यावी. मा.महापौर उठून गेले नाहीत उठून जाऊन परत आले असते व मग आदेश केले असते तर ते मान्य करता आले असते. आमच्या भावना प्रकट करतो.

श्री.संजय शिरसाठ : आपली रूलींग कायम ठेवा. आपल्या आदेशाचे पालन होत नाही.नाहीतर आम्ही सभागृहा बाहेर जातो. व याचा विरोध करतो.

मा.महापौर : ज्येष्ठ सदस्यांकडून अशा वर्तनाची अपेक्षा नाही.राजदंड पळवणे ही पध्दत नाही.

मा.उप महापौर : सभागृहात चांगल्या विषयावर चर्चा चालु होती. माजी महापौर असलेल्या ज्येष्ठ सदस्याने राजदंड पळवावा ही गोष्ट बरोबर नाही. त्यांच्यावर कार्यवाही व्हावयास हवी.

मा.महापौर : पाच मिनिठटासाठी सभा स्थगित करण्यात येते. (दुपारी ३.०५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात आली.)(दुपारी ३.०५ वाजता स्थगित करण्यात आलेली सभा ३.४५ वाजता परत मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.)

श्री.अ.साजेद : जो प्रकार झाला त्याबाबत दिलगीरी व्यक्त करतो. श्री.रशिद मामु यांचे सदस्यत्व रद्द केलेले निर्णय परत घ्यावे व सभागृहाचे कामकाज पुढे चालु करावे.

मा.महापौर : विरोधी पक्षनेता यांची मागणी मान्य करण्यात येते.

श्री.संजय शिरसाठ : मागणी मान्य करण्यास हरकत नाही. परंतु बैठकीच्या दुसऱ्या दिवशी नागरीक वृत्तात वाचतो तेव्हा वृत्तपत्रात मनपाच्या चांगल्या कामाच्या बातम्या येण्याऐवजी महापौरांच्या डायस समोर येणाऱ्या गोंधळाचे फोटो जास्त येतात. त्यामुळे पदाधिकारी व नगर सेवक यांची सर्वांचीच बदनामी होते. यानंतर कोणीही डायस समोर बोलु नये.

श्री.अ.साजेद : जे घडते ते वृत्तपत्रात येते. वृत्तपत्रांनी काय छापावे याबाबत त्यांना कोणी काही सांगत नाही.

मा.महापौर : श्री.रशिद खान मामु यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले होते. तो निर्णय विरोधी पक्षनेता यांच्या विनंतीस मान देऊन कॅन्सल करण्यात येतो. एका वेळी एकाच स.सदस्याने बोलावे.

श्रीमती बोरामणीकर : महिला कॉलेजच्या मागील बाजुस सील्लेखान्याजवळ एक बांधकाम सुरू झालेले आहे. त्यास परवानगी देण्यात आलेली आहे का? परवानगी नसेल तर ते बांधकाम थांबवावे.

स.संचालक नगर रचना : महिला कॉलेजच्या मागे जे बांधकाम चालू आहे त्यास परवानगी देण्यात आलेली नाही.

श्री.संजय शिरसाठ : मागील सर्वसाधारण सभेत तुम्ही एका विषयास स्थगिती दिली होती. परंतु विधिज्ञांचे असे म्हणणे आहे की अशी स्थगिती देता येत नाही. परमीशन घेतल्यास स्थगिती देता येते ती स्थगिती उठविण्यात यावी.

श्री.रशिद खान (मामु) : त्यास न्यायालयाने तार फेंसींगची परवानगी दिलेली आहे. मी कोर्टाची कागदपत्रे सादर करत आहे.

मा.महापौर : मनपा ची परवानगी आहे काय तपासून पहावे.

मा.उप महापौर
सौ.लता दलाल : त्यांच्या कामात अडथळा आणु नये असे कोर्टाने म्हटले आहे. परंतु एखादी व्यक्ती त्याच्या जागेवर काहीही करू शकतो का. जर अनधिकृत बांधकाम होत असेल तर मनपाचा प्रशासकीय व लीगल विभाग काय करत आहेत. कोर्ट असे आदेश देवू शकते का.

मा.आयुक्त : वायर फेंसींग करण्यासाठी कोर्टाने मान्यता दिलेली आहे. कोर्टाच्या निर्णयाची छाननी करून एका दिवसात योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

मा.महापौर : २४ तासाचे आत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

श्री.संजय शिरसाठ : मागील सर्वसाधारण सभेत आपण एका विषयास स्थगिती दिलेली आहे. विधि विभागाने अभिप्राय दिलेले आहेत. अशी स्थगिती देता येत नाही ती स्थगिती उठवावी.

मा.महापौर : स.स.श्री संजय शिरसाठ यांनी ज्या संदर्भात बोलले त्या प्रकरणात दिलेली स्थगिती उठविण्यात येत आहे.

श्रीमती बोरामणीकर : माझ्या वार्डातील अतिक्रमण काढण्याचे आदेश आपण दिले होते. परंतु अद्यापपर्यंत अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. तेथुन पाण्याची लाईन गेलेली आहे. ते तात्काळ काढण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा : १४०० एमएलडी लाईन २-३ वेळा एकाच महिन्यात फुटली मी या अनुषंगाने काही प्रश्न विचारले होते. त्या प्रश्नांचा खुलासा प्रशासनाने केला असता तर माझ्या मते ती लाईन व्यवस्थित चालली असती. मी प्रश्न विचारला होता की आपण शहरात कोणत्या वार्डास दररोज व कोणत्या वार्डास एक दिवसाआड पाणी पुरवठा करतो. हा प्रश्न विचारण्यास कारण आहे. मागील आठवड्यात शहरात श्री.नितीनजी गडकरी साहेब आले होते. त्यांनी प्रशासनाच्या काही अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर असे निदर्शनास आले की शहराच्या पाणी पुरवठ्याचे कोणतेही

नियोजन प्रशासनाकडे नाही. आपण जायकवाडी पासुन जो पाणी पुरवठा करतो त्याचे कोठेही अथौंटींक रेकॉर्ड नाही. त्यामुळे काही वार्डांना दररोज पाणी दिले जाते तर काही वार्डांना एक दिवसाआड पाणी दिले जाते. आपण २४ तास पंपींग करतो सिडको प्रशासना बरोबर तेव्हाच्या प्रशासकांनी चुकीचे ॲग्रिमेंट केले. त्यावेळेपासुन पाण्याचा त्रास सुरू झालेला आहे. ज्या ज्या वेळेस १४०० ची लाईन वा ७०० ची लाईन फुटेल त्यावेळी दुरूस्तीसाठी जो वेळ लागेल त्यावेळी आपण एमआयडीसी कडून पाणी घेऊ शकतो का याचा विचार व्हावा.

शहर अभियंता : स.स.श्री.प्रशांत देसरडा यांच्या प्रश्नास तीन दिवसात उत्तर देण्यात येईल.

सौ.विजया रहाटकर : श्री.प्रशांत देसरडा यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सभागृहातच मिळावीत.

मा.महापौर : कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) रजेवर आहेत. तीन दिवसात तुमच्या प्रश्नांची उत्तरे दिली जातील.

श्री.प्रशांत देसरडा : १४०० ची लाईन का फुटते याचे उत्तर प्रशासन देवू शकत नाही याचा अर्थ आपल्या सिस्टीममध्ये कोठेतरी गडबड आहे. आपल्याकडे पाण्याचे अकाऊंट नाही. आपण लाईन वरील ताण कमी करू शकत नाही. पाणी पुरवठ्यासाठी नियोजन आवश्यक आहे. पाण्याचे नियोजन कसे असावे, डिस्ट्रीब्युशन कसे असावे याचा सर्वे एखाद्या खाजगी कंनपीकडून करण्यात यावा. आपण संपुर्ण शहरास एक दिवसाआड पाणी दिले तर हे पाणी पुरेसे होईल असे मला वाटते.

मा.महापौर : डीस्ट्रीब्युशन सीस्टमची प्लॅनींग व्यवस्थित करण्याची गरज आहे. त्यासाठी पीएमसी अपॉइंट करण्यात यावी व अहवाल सभागृहास सादर करावा.

श्री.वसंत नरवडे पाटील : एमजेपीच्या अधिकाऱ्यांनी पाईप लाईन टाकलेली आहे. उन्हाळ्यात पाण्याची जास्तीची गरज असते. यासाठी एमजेपीच्या काही लोकांना डेप्युटेशनवर घ्यावे. त्यांच्याकडे संपुर्ण माहिती उपलब्ध आहे. चुकीच्या नियोजनामुळे पाणी व्यवस्थित रित्या मिळत नाही. चेन्नई मधील पाणी पुरवठा व सीवरेज या व्यवस्था जीवन प्राधिकरणकडे आहेत. तशी पध्दत काही वार्डात अवलंबुन पहावी. तर समांतर जलवाहिनीचा प्रश्न सुटेल.

श्री.सतीष कटकटे : प्रशासनाकडे जी पत्रे दिली जातात त्याचे उत्तर मिळत नाही. माझ्या वार्डात तीन महिन्यापासुन समाज मंदीराचे काम चालू आहे. ते काम बंद आहे एकाही पत्रावर कार्यवाही झालेली नाही.

कार्यकारी अभि.(ड्रे.वि) : स.न.से.श्री.कटकटे यांच्या पत्रानुसार मी पाहणी केलेली आहे. त्यावेळी काम बंद होते. आता नेमकी काय स्थिती आहे याची पाहणी करून आज सायंकाळ पर्यंत कळविण्यात येईल.

सौ.विजया रहाटकर : गेल्या एक महिन्यात तीन वेळा पाईप लाईन फुटलेली आहे. अत्यंत वाईट रितीने पाण्यासाठी तोंड द्यावे लागत आहे. लोकप्रतिनिधी म्हणुन प्रशासनाने यात आम्हास सहकार्य करावयास हवे. स.न.से. प्रशांत देसरडा यांनी आठ दिवसापुर्वीच प्रश्न विचारले होते. लोकांच्या तोंडचे पाणी पळाले. आणि आपण सांगता तीन दिवसात उत्तर देऊ. नगरसेवकांना लोक हैराण करतात. अशी उत्तरे सभागृहात चालणार नाहीत. शहरात रोज पाणी मिळणारे वार्डस कोणते व त्यांना किती

एमएलडी पाणी दिले जाते तसेच एक दिवसाआड पाणी मिळणारे वार्ड कोणते व त्यांना किती एमएलडी पाणी दिले जाते याची माहिती द्यावी. एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे नेमके कारण काय अधिकारी नेहमी टेक्नीकल अडचणी सांगतात. ती सॉल्व्ह होऊ शकत नाही का.

मा.महापौर : स.सदस्यांनी अत्यंत पोटतिडकीने हा विषय मांडलेला आहे.पाणी पुरवठ्याचे कार्यकारी अभियंता आज सुटीवर आहेत. त्यांनी तीन दिवसाचे आत संबंधितांना उत्तर द्यावे.

श्री.रशिद खान (मामु) : गुंठेवारीतील लोक पैसे भरत असतील तर त्यांना पाणी द्यावे लागेल. या भागास पाणी देण्यासाठी आवश्यक व्यासाची लाईन आहे काय.पंपीगला रेस्ट मिळणेही गरजेचे आहे. शहरातुन अनेक ठिकाणी नहरी वाहतात. अशा नहरींचे पाणी आपण वापरू शकतो काय याचाही विचार व्हावा.चौक येथे चार नहरी निघाल्या क्रांती चौक येथील नहर उपयोगात येईल.

मा.महापौर : शहरात ज्या नहर असतील त्यांचा सर्वे पाणी पुरवठा विभागाने करावा. व हे पाणी वापरता येईल काय याचा अभ्यास करावा.

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डात ३५ सोसायट्यांनी १०० टक्के बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे. ८ सोसायट्यांमध्ये पाईप लाईन टाकलेली आहे, परंतु त्यात पाणी नाही. १२ एमएलडी पाणी पाणी वाढण्याचे मा.आयुक्तांनी सांगितले. शहरात देण्यात येणारे पाणी व १२ एमएलडी जास्तीचे पाणी यात काटकसर करून माझ्या वार्डात ज्या सोसायट्यांनी १०० टक्के बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत. त्यांना देण्यात यावे.

श्री.दाभाडे हिम्मतराव : माझ्या वार्डात वार्ड क्र.९० मध्ये जलवाहिनी लिकेज झालेली आहेत त्यामुळे हजारो लीटर पाणी वाया जाते. अधिकारी वारंवार सांगुनही कामे करत नाहीत. फोन नेहमी बंद ठेवतात यावर आपण काय कार्यवाही करणार.

मा.महापौर : स.न.से. हिम्मतराव दाभाडे यांच्या वार्डात जे पाणी वाया जात आहे. त्या लाईन्सवरील लिकेज बंद करावेत व दोन दिवसात तसे कळवावे.

श्री.विनायक पांडे : स.न.से.श्री.रशिद खान मामु यांची सुचना रास्त आहे माझ्या वार्डात थत्ते हौद व थत्ते नहर आहे. रोज यातील लाखो लिटर पाणी वाया जाते. आपण या वाया जाणाऱ्या पाण्याचा विचार करावा. शहरात अनेक ठिकाणी अशी नहरी आहेत त्या मनपाने ॲक्वायर कराव्यात त्यामुळे किमान त्या त्या भागातील पाण्याचा प्रश्न तरी सुटू शकेल.

मा.महापौर : शहरात पाण्याची टंचाई आहे. शहरात अनेक ठिकाणी नहरी व विहीरी आहेत. त्याचा नेमका अभ्यास करण्यासाठी रशिदखान मामु यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येते. यात श्री.विनायक पांडे, पुरूषोत्तम ठाकुर, अबु बकर, किशोर तुलशीबागवाले, अनील जैस्वाल, सलीम भाई यांचा समावेश करण्यात येतो. या समितीने महिनाभर अभ्यास करून आम्हास अहवाल द्यावा. त्यानंतर त्यावर अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : माझ्या वार्डात मनपाची जागा आहे. ती मनपाने ॲक्वायर केलेली आहे. या जागेवरील अतिक्रमण दोन दिवसात काढू असे मा.आयुक्तांनी सांगितले होते. परंतु

अद्यापपर्यंत अतिक्रमण काढलेले नाही. पंचवटी समोरील टपऱ्या दिवाळी नंतर काढु बसे सांगितले होते परंतु अद्यापही टपऱ्या काढल्या नाहीत. त्या ठिकाणी हॉल बांधावयाचा आहे. बी अँड सी समोरील अतिक्रमणे तात्काळ काढावीत.

मा.महापौर : दोन दिवसात सर्व अतिक्रमणे काढावीत.

**विषय क्र.७०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री.एस.एल.कुलकर्णी, दुय्यम आवेक्षक यांना मा.कामगार न्यायालयाच्या Complaint (ULP) क्र.५६/२०००. दि.८/३/२००५ रोजीचे आदेशानुसार दि.३१/०३/२००६ पासुन मा.औद्योगिक न्यायालय येथे चालू असलेल्या अपीलाच्या निर्णयाच्या अधिन राहून कार्यव्ययी आस्थापनेवर वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० मध्ये ०६ महिन्याकरिता नियुक्ती करण्यात आलेली होती.

सदर आदेशाची मुदत दि.०१/१०/२००६ संपलेली असून संबंधितांच्या कामाच्या आवश्यकते बाबत विभाग प्रमुख यांनी मागणी केलेली आहे. सध्या त्यांच्या कामाची आवश्यकता असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार संबंधितांना पुढील सहा महिन्याकरिता दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून न्यायालयाचे आदेशाचे अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री.एस.एल.कुलकर्णी, दुय्यम आवेक्षक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार पुढील सहा महिन्याकरिता दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून न्यायालयाचे आदेशाचे अधिन राहून मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ६.२.२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत वित्तीय वर्ष सन २००७-२००८ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील मालमत्ता कराचे दर निश्चित करण्याकरीता प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास ठराव क्र.२३९ अन्वये स्थायी समितीने तत्वत: मान्यता देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केलेली आहे.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे.**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की,वित्तीय वर्ष सन २००७-२००८ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने दि.२०.२.२००७ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे सन २००७-२००८ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहेत. जे की सन २००६-०७ या वर्षा करीता सुध्दा निश्चित करण्यात आले होते. तेच दर सन २००७-२००८ या वित्तीय वर्षासाठी अंमलात राहील, जे की खालील प्रमाणे आहे.

**१) महापालिकेचे दर–**

| अ.क्र. | कराचे नांव | करयोग्य मुल्य | प्रचलित दर सन **२००६–२००७** | **स्थायी समितीने मंजूर केलेले दर सन २००७–२००८** |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १)निवासी वापराच्या सर्व करयोग्य मुल्यावर<br>२)बिगर निवासी वापराच्या सर्व करयोग्य मुल्यावर<br>३) औद्योगिक क्षेत्रामधील औद्योगिक वापरासाठी असलेल्या मालमत्तांवरील करयोग्य मुल्यावर | ३०%<br>४५%<br>३६% | ३०%<br>४५%<br>३६% |
| २ | साफसफाई कर | १)निवासी<br>२)निवासेत्तर कोणत्याही करयोग्य मुल्यावर | ३%<br>१०% | ३%<br>१०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १% | १% |
| ४ | अग्निशमन कर | | १.५% | १.५% |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २% | २% |
| ६ | पथकर | | २% | २% |
| ७ | जललाभ कर | | १.५% | १.५% |
| ८ | जलनि:सारण कर | | १.५% | १.५% |

२) तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर हे शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

३) मोकळ्या जागेवरील कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल.

करीता वरील प्रमाणेदर निश्चित करून अंमलबजावणी दिनांक १.४.२००७ पासून करण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

श्री.रशिद खान (मामु) : ३० टक्के एवढी करात वाढ केलेली आहे. त्या ऐवजी ए,बी,सी,डी अशी वर्गवारी करण्यात यावी. एम्प्लॉयमेंट व शिक्षण कर किती टक्के राहणार आहे. याचा मात्र कोठेही उल्लेख नाही.सर्व प्रकारचे कर मिळवून ते ४२ टक्के होतात. सर्व घरांना सारखाच टॅक्स नको. १९९१ मध्ये बायलॉज बनवण्यात आलेले आहेत. त्यानुसार कराची आकारणी करण्यात यावी.

मा.आयुक्त : ग्रेडच्या नुसार करयोग्य मुल्य ठरविण्यात येते व त्यावर कराची आकारणी करण्यात यावी. पुर्वी आपण इंडस्ट्रीजला स्वतंत्र कर नव्हता. त्याची वर्गवारी नव्हती. मागील वर्षी ७२ टक्के कर होता तो कमी करून आपण ६० टक्क्यापर्यंत खाली आणला. इंडस्ट्रीला ३६% ठेवावे इंडस्ट्रीजला आपण निवासी व वाणीज्य याच्या आत आणलेले आहे. शिक्षण कर व एम्प्लॉयमेंट कर शासनाचे आहेत ते किती घ्यावे. ते शासन ठरवते आपण केवळ ते वसुल करतो. करयोग्य मुल्य शहरात वेगवेगळ्या ठिकाणी वेगळे आहे. त्याचे आपण झोन्स बनवलेले आहेत. त्यावर

करांची आकारणी होते. त्यामुळे झोपडपट्टीतील घरे व इतर ठिकाणची घरे यावर वेगवेगळा कर येतो.

श्री.प्रशांत देसरडा : मालमत्ता कराचे दर काय असावेत हे सभागृहाने २००२ मध्ये ठरवून दिलेले आहे. परंतु प्रशासनाने वेळोवेळी दर न वाढवता एकदम दरवाढ केली ही प्रशासनाची चुक आहे. २००२ मध्ये एनआरव्ही दुप्पट करण्यात आली त्यामुळे करांमध्ये एकदम दुप्पट वाढ झाली. पुर्वीच ज्यांना कर लागलेले आहेत त्यांच्या करात वाढ होणार नाही.अशी अपेक्षा होती. २००२ मध्ये केलेली वाढ चुकीची होती. त्यामुळे वसुलीवरही परिणाम झाला. ज्यांना नव्याने टॅक्स लागणार आहे त्यांना नवीन दराने टॅक्स लावावा. परंतु ज्यांच्या मालमत्ता जुन्या आहेत त्यांची एनआरव्ही जुनीच ठेवावी. यामुळे टॅक्सच्या तक्रारी वाढल्या २००२ मधील ठरावाचा अभ्यास व्हावा व तो रद्द करून सुधारीत ठराव सभागृहा समोर आणावा.

मा.आयुक्त : एनआरव्ही मधील बदल हा केवळ नविन प्रॉपर्टीसाठी असतो. ज्या मालमत्ता जुन्या आहेत त्यांच्या एनआरव्ही मध्ये बदल होत नाही. मात्र त्या मालमत्तेत बदल झाला असेल तरच एनआरव्ही मध्ये बदल होईल. २००२ नंतर ज्या मालमत्ता अस्तित्वात आल्या त्यांना नवीन दराने टॅक्स लावण्यात येतो. साधारणत: १९८९ नंतर २००२ मध्ये टॅक्स वाढवण्यात आले.२००२ मध्ये सर्व शहरासाठी एकच एनआरव्ही लावण्यात आली होती.परंतु मागील वर्षी ही पध्दत बदलुन शहराची विविध झोनमध्ये विभागणी करून त्यांची एनआरव्ही विविध स्तरावर करण्यात आली.२००२ मध्ये जी नवीन लावली ती कोणासही बदलता येत नाही. २००२ चा प्रस्ताव आता बदलता येणार नाही. प्रत्येक वर्षी केवळ टॅक्सचे रेट बदलतात, एनआरव्ही नाही मागील वर्षी होते तेच टॅक्स या वर्षीही आहेत. शासनाचे कर हे आपण केवळ वसुल करून शासनाकडे भरतो. मागील वर्ष ७२ टक्क्यावरून ६० टक्क्यापर्यंत कमी केलेले आहेत. २००२ पुर्वी असलेल्या मालमत्तांच्या एनआरव्ही मध्ये कोठेही वाढ झालेली नाही. टॅक्स रेट मध्ये केवळ बदल झालेला आहे.

श्री.रशिद खान (मामु) : शिक्षण कर व शासनाचे इतर कर किती टक्के येतात.

मा.आयुक्त : शासनाचे कर ठरविण्याचा अधिकार आपणास नाही. शासनाने ठरविल्यानुसार आपण केवळ ते वसुल करून देतो. त्यात आपणास बदल करता येणार नाही.

श्री.संजय शिरसाठ : प्रशासनाने लावलेले रेट चुकीचे आहेत. बांधकाम परवानगी देताना अथवा कंप्लीशन सर्टिफिकेट देतांना त्यानंतर किती लोकांना टॅक्स लावण्यात आला याचा कोठेही उल्लेख नसतो. पुर्वी वेदांतनगर मध्ये टॅक्स बाबत कर अदालत घेण्यात आली होती. कारण लावण्यात आलेले टॅक्स चुकीचे होते. मागील वर्षा किती किती मालमत्तांना टॅक्स लावला याचे समरी रजिष्टर असते परंतु त्याचा कुठेही उल्लेख नसतो. निवासी वापरावरील टॅक्स ४५ टक्क्यार्पंत आहेत. प्रस्तावित दर जास्त आहेत. ३० टक्के ऐवजी २७ टक्के व ४५ टक्के ऐवजी ४० टक्के कर करावा.

मा.आयुक्त : आपण एनआरव्ही मध्ये बदल करत नाही, तर केवळ टॅक्स रेट बदलतो जे लोक भाड्याने घरे देतात त्यांना जास्त कर लागतो. ते भाडे बरोबर दाखवत नाहीत.

म्हणुन आपण मागील वर्षी दोन महत्वाचे निर्णय घेतले होते. शहरातील चार भाग करून त्यांना वेगवेगळी एनआरव्ही आकारणी करणे व केवळ बिल्डींगच्या आधारे एनआरव्ही लावणे. भाडेकरू गृहीत धरूनच कराची आकारणी करण्यात येते. आपण प्रॉपर्टीचे व्हॅल्युएशन बदलु शकतो एनआरव्ही नाही.

श्री.वसंत नरवडे पाटील : एनआरव्ही मध्ये बदल करता येऊ शकतो काय? १०० रू. टॅक्स भरणाऱ्या माणसास आज ७०० रू. टॅक्स भरावा लागतो. गरीब माणसे एवढा टॅक्स भरू शकत नाहीत. स्पेकच्या नोटीसांवर मी आक्षेप नोंदवलेला आहे.. त्योंनी जास्तीचे टॅक्स लावलेले आहेत. परंतु माझ्या आक्षेपावर आतापावेतो उत्तर दिलेले नाही. गुलमंडीचा बऱ्याचशा मालमत्तांचा वापर बदलला परंतु त्यांना जुन्या एनआरव्ही वरच कर लावण्यात येतो.रीपेअरींगची परवानगी घेऊन पुर्ण वापरातच बदल करण्यात येतो.

मा.आयुक्त : टॅक्स बाबत काही तक्रारी असतील तर त्या सोडविण्यात येतील.

मा.महापौर : कुठल्याही प्रकारची वाढ न करता प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. आहे तसा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

श्री.प्रशांत देसरडा : स्पेक कंपनीच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीचे काय झाले ते कळवावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सन २००७-०८ या वित्तीय वर्षासाठी सन २००६-०७ या वर्षाकरीता निश्चित करण्यात आले होते. तेच दर २००७-०८ वित्तीय वर्षासाठी आमलात आनण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०३ :**

दिनांक १६.०१.२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत प्रभाग क्र.२६ अंतर्गत विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामासाठी र.रू.१५,९३,६००/- चे अंदाजपत्रकास विकास शुल्क जमा करून घेणेबाबत प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास ठराव क्र.१९३ अन्वये स्थायी समितीने मान्यता देवून प्रस्तावातील अटी बाबत निर्णय घेण्यास सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यास शिफारस केली आहे.

**प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालील प्रमाणे.**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.२६ अंतर्गत विविध स्वयंविकसित गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन २००५-०६ च्या दरसूचीनुसार र.रू.१५,९३,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००६-०७ या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी सदरील स्वयं विकसित संस्थेकडून नगर रचना विभागाच्या प्रचलित दरानुसार विकास शुल्क जमा करून घेणेच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास शिफारस केली आहे.

तरी रक्कम रू.१५,९३,६००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र.१७ च्या निर्णयास अधिन राहून मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.२६ अंतर्गत विविध स्वयंविकसित गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन २००५-०६ च्या दरसूचीनुसार र.रू.१५,९३,६००/- चे अंदाजपत्रकास विषय क्र. १७ च्या निर्णयास अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.माळवतकर : स्वयंविकसीत सोसायट्या २०-२५ वर्षापुर्वीच्या आहेत. त्यांना मंजुरी द्यावी. त्या ठिकाणी फक्त सोयी सुविधा देत आहेत.

मा.महापौर : विषय क्र.१७ च्या निर्णयास अधिन राहून मान्यता देण्यात येते.

**विषय क्र. ७०४ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करत आहे की, मा.महापौर यांच्या दालनात दिनांक २२.१२.०६ रोजी मा.महापौर,मा.आयुक्त,मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी व आर.एम.ए. संघटनेचे पदाधिकारी यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार जैविक कचरा सेवा शुल्क दराबाबत दर कमी करण्यासाठी सुधारीत प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील जैविक कचरा निर्माण करणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय व्यवसायीक, रूग्णालय, दवाखाने,रक्तपेढ्या, प्रयोगशाळा, विज्ञान वैद्यकीय, पशु वैद्यकीय महाविद्यालय, संशोधन संस्था, कत्तलखाना,पशु वैद्यकीय दवाखाने/ रूग्णालय, गोठे, तबेले, कुकुटपालन केंद्र, दुग्धव्यवसाय केंद्र इ.ॲक्युपायर म्हणजे जैविक कचऱ्याची निर्मीती करणाऱ्यांनी जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे. बंधनकारक असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेने शहरातील सर्व ॲक्युपायर यांना कॉमन फॅसीलीटी अंतर्गत जैविक कचरा प्रकल्प दिनांक १.११.२००३ पासुन उपलब्ध करून दिलेली आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५३४/२१ दिनांक २१.१२.०१ अन्वये जैविक कचरा ॲक्युपायरकडून नियमीतपणे गोळा करून त्याचे परिवहन व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी सेवा शुल्क दर निश्चित करण्यात आले आहे.

मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट, नाशिक (ठेकेदार) व महानगरपालिका औरंगाबाद यांनी जैविक कचरा प्रकल्प कार्यान्वीत करण्या करीता दिनांक १९.०९.२००२ करार नामा केलेला आहे.

दिनांक १.११.२००३ पासुन सदरील जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला असुन अटी व शर्ती मा.सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या सेवा शुल्क दराप्रमाणे सभा सदाकडून मासीक शुल्क करण्यात येते. तथापि इंडियन मेडीकल ॲसोसिएशन, इंडियन डेंटल ॲसो. हिम्पस, एन.ई.एम.आय. इ. वैद्यकीय संस्था व ॲक्युपायर यांनी सेवा शुल्क दर कमी करण्याबाबत अनेक वेळा विनंती केली आहे. या संबंधि मा.सर्वसाधारण सभेत ५.८.२००४ रोजी स.न.श्री.जयंतओक व स.न.श्री.रणधीर होलीये यांनी अप्रशासकीय प्रस्ताव सादर करून जैविक कचरा मासिक सेवा शुल्क दर कमी करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्या अनुषंगाने ठराव क्र.४२२/०१ दिनांक ५.८.२००४ अन्वये ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

प्रशासनाच्या वतीने जैविक कचरा मासिक सेवा शुल्क दराबाबत सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली असुन सल्लागार समितीच्या शिफारीनुसार दिनांक १६.८.२००५ रोजी ॲक्युपायर विविध वैद्यकीय संघटनेचे पदाधिकारी, ठेकेदार व मनपा प्रशासन यांची मा.आयुक्त यांच्या दालनात सेवा शुल्क दर सर्व संमतीने कमी करण्याकरीता बैठक झाली होती. यामध्ये ठेकेदार व मनपा प्रशासन वतीने करारनाम्यातील अटी व शर्तीचे अधीन राहून दिनांक २०.१२.०१ च्या मा.सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या

सेवा शुल्क दरात सुधारणा करून दिनांक ७.१०.०५ रोजी मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.६७/८ नुसार विषय ठेवण्यात आला होता.

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी एक समिती स्थापन करून करार रद्द करण्यात येईल किंवा जी २५% रॉयल्टी महानगर पालिका ती न घेता डॉक्टारांना आणखी काही सवलत घेता येईल किंवा ३.५०/- रू. पेक्षा आणखीन काही कमी करता येईल का? या बाबतीत हा ठेका रद्द् करून महानगरपालिकेला चालविता येईल का? या बाबत महानगरपालिकेचे पदाधिकारी ५ सदस्याची कमीटी नियुक्त करून निर्णय घेणे व तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ॲक्युपायर कडून सभासद फीस ५००/- रू. व फॉर्म फी १०/- रू. एवढी फीस आकारून आजीवन सभासदत्व करून घेणे व त्यानंतर संबंधीत ठेकेदाराने रूग्णालय दवाखाना इतर जैविक कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांमधील जैविक कचऱ्याचे परिवहन करून त्याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी सुधारीत सेवा शुल्क दर खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | सुधारीत दर |
|---|---|---|
| १ | १ ते ४ खाटा | रू.३५०/- प्रति माहा |
| २ | ५ ते ५० खाटा | रू.३.०० प्रति दिन प्रति खाट |
| ३ | ५१ ते २०० खाटा | रू.२.५० प्रति दिन प्रति खाट |
| ४ | २०० ते ५०० खाटा | रू.२.५०प्रति दिन प्रति खाट |
| ५ | ५०१ ते पुढे | रू.२.००प्रति दिन प्रति खाट |
| ६ | सल्लाकक्ष | रू.१५०/- प्रति माहा |
| ७ | दवाखाने सर्व चिकित्सा पध्दतीचे | रू.१५०/- प्रति माहा किंवा संपुर्ण वर्षाचे एकाच पैसे भरले तर रू.१२५/-प्र.माह |
| ८ | दंत शल्क चिकित्सक | रू.२५०/- प्रति माहा |
| ९ | पॅथॉलॉजी,प्रयोगशाळा,रक्तपेढी, विर्यपेढी, आवयव प्रत्यारोपन कें.इ. | रू.३५०/- प्रति माहा |
| १० | गुरांचे दवाखाने/रूग्णालय, प्रतिरोपण कें. कुकुटपालन कें, दुग्धव्यवसाय कें. | रू.३५०/- प्रति माहा |
| ११ | सर्व विज्ञान महाविद्यालय | रू.२५०/- प्रति माहा |
| १२ | इतर सर्व ॲक्युपायर | रू.२५०/- प्रति माहा |

या प्रमाणे करार नाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहून खालील अटीचा समावेश करण्यात येत आहे.

- प्रस्तावित केलेल्या सुधारीत सेवा शुल्क दर दिनांक १.४.०७ ते ३१.३.२००८ पर्यंत लागु राहतील व दिनांक १.४.०८ पासुन सुधारीत सेवा शुल्क दरात प्रतीवर्ष ४ टक्के दर वाढ केली जाईल व त्यानुसार दर आकारण्यात येतील.
- सभासदाकडे (ॲक्युपायर) जैविक कचरा उचलण्यास ठेकेदारांचे वाहन न गेल्यास (४८ तासा मध्ये) प्रतिदिवस रू.५०/- सदरील दवाखाना/ रूग्णालय प्रमाणे ठेकेदारास दंड आकारण्यात येईल.
- ॲक्युपायरने (सभासदाने) प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत सेवा शुल्क न भरल्यास पुढील प्रत्येक १० दिवसासाठी रू.५०/- दंड आकारण्यात येईल.

- दिनांक १.११.२००३ पासून जैविक कचऱ्याचे सभासद झालेले आहे. परंतु या प्रकल्पाच्या सेवा काही कारणास्तव घेतलेल्या नाही किंवा मिळालेल्या नाही अशा काही सभासदांना रू.१.५०/५ प्रति खाट प्रमाणे दर आकारून दिनांक ३१.३.०७ पर्यंत देयक अदा करून या पुढे नियमीत सेवा द्यावी व ठेकेदारांनी नियमीत सेवा द्यावी.

वरील प्रमाणे प्रस्तावित सेवा शुल्क दर व सुधारीत अटी व शर्ती यांचा समावेश केल्यास मनपा क्षेत्रातील जैविक कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांना जैविक कचरा प्रकल्पाचे सभासद करून घेवून नियमित सेवा शुल्क वसुल करण्यात येईल. करीता जैविक कचरा सुधारीत सेवा शुल्क दर व सुधारीत अटी व शर्ती मा. सर्व साधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्रीमती डॉ.आशा बिनवडे : मनपा जी बायोमेडीकल वेस्टची सेवा डॉक्टर्सना देते त्याचे शुल्क कमी करण्याचा हा प्रस्ताव आहे. आपण तीन वर्षापुर्वी हा प्रस्ताव सुरू केलेला आहे. एजन्सी सोबत करारनामा ही केलेला आहे. मात्र स्थायी समिती समोर आलेला करारनामा व प्रत्यक्षात एजन्सी बरोबर झालेला करारनामा यात तफावत आहे.करारनाम्यातील अटींचे पालन एजन्सीकडून होत नाही.स्थायी समिती समोर ठेवलेला कररारनामा व प्रत्यक्षात झालेला करारनामा याच्या प्रती आम्हास द्याव्यात. एजन्सीबाबत अनेक तक्रारी आहेत. आतापर्यंत किती दंड वसुल झाला याची माहिती द्यावी. हा प्रकल्प सध्या चालु आहे काय याचीही पाहणी होणे गरजेचे आहे. शहरातील डॉक्टर्सना आपण कुठल्याही प्रकारच्या चांगल्या सेवा दिलेल्या नाहीत. प्रकल्पाचा रेव्हू घेण्यासाठी एक कमेटी स्थापन करावी व दर तीन वर्षांनी रेव्हू घ्यावा.अशी मुळ करारनाम्यात जो स्थायी समिती समोर ठेवण्यात आला होता,अट होती. परंतु करारनामा करत असताना ही अट वगळुन सल्लागार समिती नेमावी अशी अट टाकण्यात आल्याचे समजते. सल्लागार समितीत कोण कोण आहेत हे आम्हाला माहित नाही. समितीने आतापर्यंत काय सल्ले दिले सुचना दिल्या तेही मला माहित नाही.प्रकल्पाचे काम कसे आहे हेही अंधारात आहे. तेव्हा सल्लागार समिती न ठेवता नियंत्रण ठेवणारी समिती ठेवावी. प्रस्तावात शेवटची अट ''दि.१.११.२००३ पासुन जैविक कचऱ्याचे सभासद झालेले आहे परंतु या प्रकल्पाच्या सेवा काही कारणास्तव घेतलेल्या नाही किंवा मिळालेल्या नाही अशा काही सभासदांना रू.१.५० प्रति खाट प्रमाणे दर आकारून दि.३१.३.२००७ पर्यंत देयक अदा करून यापुढे नियमीत सेवा द्यावी'' टाकण्यात आलेली आहे. परंतु सेवाच दिलेल्या नाहीत तर शुल्क कशाचे आकारणार. सेवा दिल्याच्या तारखेपासुन शुल्क आकारणी करण्यात यावी. ही अट काढुन टाकावी.१३.१.०७ स्थायी समितीत मी तक्रार दिली होती की, या प्रकल्पाचे रीकव्हरी ऑफीसर डॉक्टर्सकडे जाऊन त्यांना शिवीगाळ करतात,धमक्या देतात. याबाबत मुकुंदवाडी येथे डॉ.परदेशी यांनी तक्रार दाखल केलेली आहे. आपण याची चौकशी तीन दिवसात करतो म्हणाला होतात. परंतु महिन्याभरात काहीही झालेले नाही. प्रकल्पाचा रेव्हू पुढे कशा प्रकारे करणार आहोत याची माहिती द्यावी. जर एजन्सी धारक अटींचे पालन करत नसेल तर हा प्रकल्प रद्द करण्यात यावा.

श्रीमती कला बोरामणीकर: कंत्राटदार बरोबर काम करत नाही पैसे मात्र पुर्ण वर्षाचे घेतो. कंत्राटदाराच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या त्या भागातील नगरसेवकांची नियंत्रण समिती ठेवावी डॉक्टर्स पूर्ण वर्षाचे पैसे देण्यास तयार आहेत.

श्री.संजश जोशी : या संदर्भाने स्थापलेल्या समितीने आतापर्यंत कधीही तो प्लॅन्ट पाहिलेला नाही.मागील काही दिवसापासुन हा प्लॅन्ट बंद आहे. या प्लॅन्टसाठी नारेगांव येथे जागा देण्यात आली होती मग तो पाटोदाकडे शिफ्ट का करण्यात आला. हा प्लॅन्ट पाहिला तर दिसुन येते की त्याच्या शटरवर व चिमणीवर धूळ जमा झालेली आहे. कचरा प्रत्यक्षात प्लॅन्टवर जातच नाही. ॲग्रीमेंट नुसार स्थापलेल्या समितीची बैठक लावण्यात यावी.

मा.आयुक्त : नारेगाव येथे प्लॅन्ट न लावण्याबाबत हाय कोर्टाचे आदेश आहेत.

श्री.प्रशांत देसरडा : सत्यम पेक्षा हा प्रस्ताव भयानक आहे. स्थायी समिती, सर्वसाधारण सभेसमोर आलेला करारनामा व प्रत्यक्षात झालेला करारनामा यात मोठी तफावत आहे. आपण या तिन्ही करारनाम्याची एक एक प्रत मागवुन घ्यावी. जर त्यात बदल केला गेला असेल तर संबंधितांवर कार्यवाही करावी.या प्लॅन्ट बाबत बरेच वाद झालेले आहेत. या प्लॅन्टवर आतापर्यंत लाईट बील किती अदा केले हे पाहिले तरी लक्षात येईल. की हा प्लॅन्ट चालु आहे किंवा नाही. ठेकेदार डॉक्टरांकडे ८-८ दिवस जात नाही. जमा केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. ठेवण्यात आलेल्या तक्रार रजिष्टरमध्ये स्वत: चीच एन-८ रूग्णालयाची तक्रार आहे की, ठेकेदार दररोज कचरा नेत नाही. आतापर्यंत किती दंड लावला याचाही खुलासा व्हावा. लावण्यात आलेले रेट हे संघटनेशी चर्चा करून लावण्यात आलेले आहेत काय याचीही माहिती द्यावी.

मा.महापौर : शेवटची अट रद्द करून विषय मंजुर करण्यात येतो. लवकरात लवकर समितीची बैठक घेण्यात येईल. सल्लागार समितीने वारंवार बैठका घेतल्या पाहिजेत.

श्री.भगवान घडमोडे : हा ठेका रद्द करून मनपा हे काम करू शकेल का याचीही पाहणी करावी. यासाठी ५ सदस्यांची समिती स्थापन करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिका क्षेत्रातील जैविक कचरा निर्माण करणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय व्यवसायीक, रूग्णालय, दवाखाने,रक्तपेढ्या, प्रयोगशाळा, विज्ञान वैद्यकीय, पशु वैद्यकीय महाविद्यालय, संशोधन संस्था, कत्तलखाना,पशु वैद्यकीय दवाखाने/ रूग्णालय, गोठे, तबेले, कुकुटपालन केंद्र, दुग्धव्यवसाय केंद्र इ.ॲक्युपायर म्हणजे जैविक कचऱ्याची निर्मीती करणाऱ्यांनी जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे करीता सेवा शुल्क दर कमी करून शेवटची अट रद्द करून हा या विषयास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अतिवृष्टीच्या काळात खामनदीस पुर आल्यामुळे हिमायतबाग, आरेफ कॉलनी, आसेफ बाग,अलहिलाल कॉलनी,जलाल कॉलनी, बेगमपुरा, तळेश्वर मंदीर, हर्सूल, जटवाडा रोड इत्यादी परिसरात पुराच्या पाण्याचा शिरकाव होऊन जीवघेण्या समस्या निर्माण झाल्या होत्या.

या परिसरातून वाहणाऱ्या खामनदीच्या पात्राच्या कडेस सुरक्षीततेच्या दृष्टीने संरक्षीत भिंत बांधणे बाबत विविध संघटना, लोकप्रतिनिधी आणि त्या परिसरातील नागरीकांची मागणी केली आहे.

अतिवृष्टीच्या काळात सदरील ठिकाणच्या परिस्थितीची पहाणी महानगरपालिकेच्या सर्व वरीष्ठ अधिकारी व अभियंत्यांनी केली आहे. प्रत्यक्ष ठिकाणच्या परिस्थितीनुरूप उद्भवलेल्या जिवघेण्या समस्येचे निराकरण करणेसाठी पहिला टप्पा-हिमायत बाग ते बेगमपुरा तळेश्वरमंदीर स्मशानभूमी पर्यंत खामनदीच्या पात्रास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदापत्रक सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन रक्कम रूपये ९,२९,४३,०००/- चे होत आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव विषय क्र. ६१७ दिनांक १५.१२.२००६ अन्वये वित्त आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या रक्कमेतुन दिड कोटी रूपये जलनि:सारण विभागासाठी वळती करणेस मंजुरी प्राप्त आहे. या रक्कमेतून रूपये १,२०,००,०००/- प्रस्तुत कामासाठी खर्च करण्याचे आणि उर्वरीत रक्कम रूपये ८,०९,४३,०००/- तरतुद आगामी अर्थसंकल्प सन २००७-०८ मध्ये उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावीत आहे.

अंदाजपत्रक रक्कम रूपये ९,२९,४३,०००/- मंजुरीस्तव व प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : हा भाग हर्सुल जहांगीर कॉलनीपासुन सुरू होतो. हर्सुल तलाव पुर्णपणे भरल्यानंतर ओव्हर फ्लो होतो. या भागात बऱ्याचशा ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. त्यामुळे पाणी थांबते या भागातील अतिक्रमणे काढण्यात यावीत. ६०-७० फुटाच्या एरीयात अतिक्रमणे झालेली आहेत. या भागाचा सर्वेही झालेला आहे. नदीची लांबी रूंदी चेक करून नदीतील गाळ काढुन नंतर संरक्षित भिंत बांधणे गरजेचे आहे. ३ कोटी रूपये जलनि:सारणासाठी ठेवण्याचे ठरले होते. काम सुरू करण्यापुर्वी अतिक्रमण काढून घेण्यात यावे, पुन्हा सर्वे करावा व काम मंजुर करण्यास हरकत नाही.

श्री.भगवान घडमोडे : हा ठराव म्हणजे लोकांना अतिक्रमण करण्यास प्रोत्साहीत करणे अशा प्रकारचा आहे. अतिक्रमण करणारांना आपण संरक्षण देत आहोत काय हा प्रस्ताव आपण मंजुर केला तर शहरातील सर्व नद्यांवर अतिक्रमणे होतील व नद्यांना पण संरक्षित भिंती बांधाव्या लागतील. हा ठराव मंजुर करण्यात येवू नये. नदीचे पात्र छोटे करून संरक्षित भिंत बांधणे हे कोणत्या नियमात बसते.

मा.आयुक्त : पावसाळ्यात दरवर्षी हर्सुल मधुन येणारे पाणी अलहीलाल कॉलनीतुन खाम नदीत येते. हा प्रश्न कायमस्वरूपी मांडलेला आहे. नदीच्या पात्राचा सर्वे करण्यात आलेला आहे. नदीतील अतिक्रमणांची नोंद केलेली आहे.ही अतिक्रमणे काढावयाची आहेत. पाणी वाहण्यासाठी योग्य पात्र बनवायचे आहे. नदीचे पात्र उथळ असल्यामुळे पाणी पसरते. पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी देखील आवश्यक आहे.

श्री.संजय शिरसाठ : नदीचे पात्र कशाच्या आधारे मोजलेले आहे. त्याचा नकाशा वगैरे महानगरपालिकेकडे आहे का.

श्री.विनायक पांडे : हा सर्वे झाला तेव्हा मी,श्री.रविकांत गवळी, श्री.पुनमचंद बमणे हजर होतो. तीघांच्याही वार्डाशी हा प्रश्न निगडीत आहे.सावंगी हर्सुल तलावातुन यावर्षा जे

पाणी आले होते ते अनेक वसाहतींमध्ये शिरले होते. स्थायी समितीमध्ये संरक्षक भिंत बांधण्याबाबत चर्चा झाली होती. नदीकाठची अतिक्रमणे तर निघालीच पाहिजेत. परंतु नदीचे पात्र कुठपर्यंत आहे याचा सर्वे व्यवस्थीत व्हावयास हवा. एकदम ९ कोटीचे बजेट न करता १.२० कोटीचे प्रस्तावित काम प्रायोगिक तत्वावर करून पहावे.

श्री.रशिद खान (मामु) : औरंगाबाद येथील सर्व नाल्यांवर अतिक्रमणे झालेली आहेत. बऱ्याचशा नाल्यांवर संरक्षक भिंती बांधलेल्या आहेत. अतिक्रमणे काढण्यात यावी. पाणचक्की ते सिध्दार्थ उद्यान नाल्यास अशी भिंत बांधण्यात आलेली आहे. याचाच भाग आहे.नदीचे पाणी वसाहतीत घुसते यासाठी भिंत बांधणे गरजेचे आहे.अर्ध्या नदीस संरक्षित भिंत आहे. गरम पाणी भागात भिंत झालेली आहे त्यातुन ड्रेनेजचे पाणी वाहते. पुराच्या पाण्याने नुकसान होऊ नये शहर आमचे आहे. काम करणे आवश्यक आहे.मा.पदाधिकाऱ्यांनी आश्वासन दिलेले आहे.

श्री.वसंत नरवडे पाटील : ज्या भागांचा उल्लेख यात नाही त्यांना आपण संरक्षण देणार नाही काय.शहरी भागातही बऱ्याचशा ठिकाणी पाणी घुसते त्याचाही विचार व्हावा. अशा कामांसाठी सरकारकडून काही विशेष निधि मिळतो काय हेही तपासून पहावे. नारेगांव, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी या भागातही पाणी घुसते मनपाच्या तिजोरीवर भार टाकुन काम करू नये.

श्री.मधुकर सावंत : नाल्यांना संरक्षण भिंत बांधण्यासाठी ९ कोटी खर्च करण्याची आवश्यक्ता नाही. नाल्यावरील अतिक्रमणे काढण्यात यावीत. ज्यांनी अशा ठिकाणी प्लॉट घेतलेले असतील त्यांच्यावर गुन्हा दाखल करा.

श्री.संतोष खेंडके पाटील : अतिक्रमणे काढण्यासाठी खर्च करावयाचा, परंतु संरक्षण भिंत बांधण्यासाठी खर्च करावयाचा हे बरोबर नाही. भविष्यात असे काही होऊ नये याची खबरदारी घ्यावी. अतिक्रमणे करणारावर गुन्हे दाखल करण्यात यावेत. या कामावर १ कोटी खर्च करण्यात यावेत.

श्री.गजानन बारवाल : आपण २० लाख रूपये देवून शाह कन्सलटन्सीकडून सर्वे करून घेतलेला आहे. त्या ठिकाणी आपली जागा किती आहे, नदीचे पात्र किती आहे हे प्रथम निश्चित करण्यात यावे. नंतरच त्या ठिकाणी बांधकाम करण्यात यावे.

श्री.अ.साजेद

: माझ्या वार्डातूनही नदी जाते. त्यावरही संरक्षक भिंत बांधण्याचे काम करण्यात यावे.

श्री. साहेबराव कावडे : हे काम गुंठेवारी मध्ये करण्यात येत आहे. त्यावर खर्च करता येतो का. ही नदी स्लममध्ये आहे का गुंठेवारीत याचा खुलासा व्हावा. माझ्या वार्डातही गुंठेवारीत अशा प्रकारचे काम करण्यात यावे.

मा.आयुक्त : नदी असुन नदीच्या बाजूचा थोडासा भाग गुंठेवारीचा आहे.

श्री.सलीम खान : नदीकाठच्या लोकांच्या जिवीताचे नुकसान होऊ नये. यासाठी हे काम करणे गरजेचे आहे. यासाठी जास्तीची तरतुद करण्यात यावी. दोन कोटी ठेवावे

श्रीमती मसरत बेगम : जनतेची सुरक्षीतता महत्वाची आहे. हा भाग माझ्या वार्डात येतो. पावसाळ्यात पाणी सगळीकडे पसरते यामुळे नागरीकांच्या जीवीतास धोका पोहोचतो. त्या ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार यासाठी जास्तीच्या पैशाची तरतुद करण्यात यावी. अतिक्रमणे हटवण्यास हरकत नाही. त्याठिकाणी मा.आयुक्त व पदाधिकाऱ्यांनीही भेट दिलेली आहे. गेल्या वर्षी जसे नुकसान झाले ते पुन्हा होऊ नये.

मा.महापौर : हर्सुल, जहांगीर कॉलनी,सादातनगर सह प्रस्तावात नमुद केलेल्या भागात हे काम करणे गरजेचे आहे.या भागात अनधिकृत बांधकामे /प्लॉटींग करणारांवर योग्य ती कार्यवाही करावी.या कामासाठी नवीन लेखाशिर्षमध्ये १.५ कोटी तरतुद ठेऊन काम सुरू करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अतिवृष्टीच्या काळात खामनदीस पुर आल्यामुळे हिमायतबाग, आरेफ कॉलनी, आसेफ बाग,अलहिलाल कॉलनी,जलाल कॉलनी, बेगमपुरा, तळेश्वर मंदीर, हर्सूल, जटवाडा रोड,जहागीर कॉलनी,सादात नगर इत्यादी परिसरात पुराच्या पाण्याचा शिरकाव होऊन जीवघेण्या समस्या निर्माण झाल्या होत्या. या परिसरातून वाहणाऱ्या खामनदीच्या पात्राच्या कडेस सुरक्षीततेच्या दृष्टीने या भागास संरक्षीत भिंत बांधणे या कामाचा पहिला टप्पा रक्कम रूपये ९,२९,४३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच र.रू.१,२०,००,०००/- बाराव्या वित्त आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या रकमेतुन या कामासाठी वळती करून या कामासाठी नवीन लेखाशिर्षमध्ये १.५ कोटी तरतुद ठेऊन काम सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०६ :**

आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, बायजीपुरा मध्यवर्ती जकात नाक्यामागे कुत्र्यासाठी स्टरलायझेन व अँटीरेबीज व्हॅक्सीनेशन अंतर्गत केंद्र बांधण्याकरीता र.रू.१०.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामास्तव सन २००६-०७ या आर्थिक वर्षा अंतर्गत तरतुद उपलब्ध नाही त्या करीता प्राणी संग्रहालय इतर ठिकाणी हलविण्यात येणार असल्या कारणाने प्राणी संग्रहालय विकसीत करणे या लेखा शिर्षा अंतर्गत सन २००६-०७ या आर्थिक वर्षात स्पील ओव्हर असलेले काम अर्थसंकल्पीय पुस्तीका पा.क्र.डब्ल्यु-५४ अ.क्र.१ नुसार प्राणी संग्रहालय येथे पाण घोड्यासाठी पिंजऱ्याचे बांधकाम करण्या करीता र.रू.१०.५५ ची तरतुद आहे. सदरील तरतुदीमधून उपरोक्त कामासाठी र.रू. १०.०० लक्ष ची तरतुद वळती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.महापौर : पशुधन विकास अधिकारी यांनी खुलासा करावा.

डॉ.रझवी : एक डॉग हाऊस नव्याने बनवावयाचे आहे. यासाठी बजेटची कमतरता आहे. झू शिफ्ट होणार असल्याने पाणघोड्याचे घर बांधण्याची आवश्यक्ता नाही. तो पैसा डॉग हाऊस बांधण्यासाठी वळविण्यात यावा. कुत्र्यांचे निर्वीगिकरण करण्यासाठी ऑपरेशन थिएटर बांधावयाचे आहे.

श्री.संजय शिरसाठ : ९८ वार्डामध्ये कुत्रे पकडण्यासाठी एकच डॉग व्हॅन आहे. २० कुत्रे दिवसभरात पकडता स्टाफवर किती खर्च होतो.

श्री.रशिद खान (मामु) : रात्रीच्या वेळी कुत्रे पकडण्यात यावेत. दिवसा कुत्रे सापडत नाहीत,गाडी पाहिली की पळून जातात.

श्री.माळवतकर : आमच्या भागातील कुत्रे पकडून नेण्यात यावेत. दोन महिन्यापासुन मी तक्रार करत आहे. परंतु डॉग व्हॅन येत नाही. पकडलेले कुत्रे परत सोडून देण्यात येतात.

डॉ.रझवी : त्यात कोर्टाचे आदेश आहेत. त्यानुसार पकडलेल्या कुत्र्यांचे ऑपरेशन करून परत तेथेच त्यांना सोडून देण्यात येते.

मा.महापौर : ठराव मंजुर नागरीकांकडून तक्रार आली तर रात्रीसुध्दा कुत्रे पकडण्याची व्हॅन कुत्रे पकडण्यासाठी पाठवावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,बायजीपुरा मध्यवर्ती जकात नाक्यामागे कुत्र्यासाठी स्टरलायझेन व अँटीरेबीज व्हॅक्सीनेशन अंतर्गत केंद्र बांधण्याकरीता र.रू.१०.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामास्तव सन २००६-०७ या आर्थिक वर्षा अंतर्गत तरतुद उपलब्ध नाही त्या करीता प्राणी संग्रहालय इतर ठिकाणी हलविण्यात येणार असल्या कारणाने प्राणी संग्रहालय विकसीत करणे या लेखा शिर्षा अंतर्गत सन २००६-०७ या आर्थिक वर्षात स्पील ओव्हर असलेले काम अर्थसंकल्पीय पुस्तीका पा.क्र.डब्ल्यु-५४ अ.क्र.१ नुसार प्राणी संग्रहालय येथे पाण घोड्यासाठी पिंजऱ्याचे बांधकाम करण्या करीता र.रू.१०.५५ ची तरतुद आहे. सदरील तरतुदीमधून उपरोक्त कामासाठी र.रू. १०.०० लक्ष ची तरतुद वळती करण्याचा प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात औरंगाबाद महानगरपालिके मार्फत एकुण २६ वाहतुक संकेतन (Traffic signals) बसविण्यात आले आहेत. या बसविण्यात आलेल्या वाहतुक संकेतक चालू बंद करणे,नियंत्रण ठेवणे व देखरेख करणेचे काम औरंगाबाद शहर पोलीस (वाहतूक शाखा) यांच्या मार्फत करण्यात येते आणि संकेताची देखभाल दुरूस्ती, पोल,केबल,पॅनल, बोर्ड शिफ्टींग, लॅम्पहेड दुरूस्ती इ. कामे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतूदीनुसार करण्यात येतात. तसेच नवीन वाहतूक संकेतकांच्या कामाकरीता शहर पोलीस वाहतूक शाखा,मा.पोलीस आयुक्त यांचे सह स्थळ पाहणी करून मा.पोलीस महासंचालक (वाहतूक),महाराष्ट्र शासन यांच्या मंजुरीनूसार नवीन काम प्रस्तावित करण्यात येत असतात.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे बसविण्यात आलेले सिग्नल Traditional type म्हणजे Buld lamp halide प्रकारचे असून, वरील प्रमाणेच्या संकेतकांची आयुष्य संपलेले असुन, ते पूर्णपणे बदलणे आवश्यक आहे. ते चालू राहावे म्हणून त्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी प्रत्येक वर्षी सरासरी सुमारे २०.०० लक्ष रूपये खर्च येत असुन, त्याचे अंदाजे वार्षीक बिलाची Energy bill ची रक्कम रू.(**१२×२६×२०००= ६२४०००)** सुमारे रू.६.२४ लक्ष इतकी येते. म्हणजे वरील प्रमाणे अस्तित्वात असलेल्या संकेतकांना प्रतिवर्ष अंदाज रू.२६.२४ लक्ष चा खर्च येतो. अस्तित्वातील संकेतके जुने झाल्यामुळे सदरील वाहतूक संकेतकाच्या दुरूस्तीच्या खर्चात भविष्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

वरील सर्व बाबी पाहता औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व २६ पारंपारीक वाहतूक संकेतका ऐवजी खाजगी अभिकर्ता नेमूण बी.ओ.टी. तत्वावर L.E.D.Lamp head असलेले व Solar

Energy वर चालणारे अत्याधुनिक वाहतूक संकेतके बसविणे प्रस्तावित आहे. यामध्ये खालील अटी शर्तींच्या अधीन राहून प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. शहरातील अस्तित्वातील असलेल्या सर्व संकेतकांचे जागी त्या ठिकाणी सौरशक्तीवर चालणारे Solar Energy व LED Lamp head असलेले वाहतूक संकेतक स्वखर्चाने लावावे.

२. सदरील बसविण्यात आलेल्या वाहतूक संकेतकांची दहा वर्ष पर्यंतची देखभाल दुरूस्ती वाहतूक संकेतक बसविणाऱ्या एजन्सीची राहील.

३. प्रत्येक चौकात बसविण्यात येणारे वाहतूक संकेतकाचे खांबावर Signal count down counter display (वेळ दर्शविणारी यंत्रणा) बसविणे आवश्यक राहील.

४. प्रत्येक चौकात एजन्सीला Digital display boards बसविण्याची परवानगी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल. याव्दारे जाहीरातीची प्रसिध्दी करण्याची परवानगी देण्यात येईल. जाहीरात प्रसिध्दीच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून जी एजन्सी महानगरपालिकेस जास्तीत जास्त हिस्सा देईल. त्या एजन्सीला महानगरपालिका निर्धारीत करील. निर्धारीत एजन्सीला महापालिका ठरविल त्या Specification प्रमाणे सौर उर्जेवर चालणारे LED Lamp head असलेले वाहतूक संकेतक बसविणे बाबत परवानगी देण्यात येईल व त्या एजन्सी बरोबर दहा वर्षाचा करारनामा करण्यात येईल.

५. सर्व वाहतूक संकेतात विद्युत निरिक्षक यांचेकडून चाचणी व प्रमाणीत करून घेणे एजन्सीस बंधनकारक राहील.

६. वाहतूक संकेतकांचे पोलवर जाहीरात बसवितांना कार्यकारी अभियंता , राज्य वाहतूक शाखा मुंबई यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार जाहीरात लावण्याचे काम करणे एजन्सीला बंधनकारक राहील.

७. बसविण्यात येणाऱ्या वाहतूक संकेतांक , व जाहीरात बोर्ड व इतर तत्सम बाबींमुळे अपघात, वित्त/जिवीत इ.साठी सर्वस्वी एजन्सी जबाबदार राहील.

८. या एजन्सीने शहर पोलीस (वाहतूक शाखा) कार्यालयाबरोबर नियमीत संपर्कात राहून बसविण्यात आलेल्या संकेतकांची देखभाल दुरूस्ती, साफ सफाई करावी, तसेच बसविलेल्या सर्व संकेतकांचा साप्ताहिक अहवाल सादर करावा.

९. बसविण्यात आलेल्या सौर उर्जे वरील संकेतकांचा करारनाम्याच्या कालावधीचा विमा काढणे एजन्सीला बंधनकारक राहील.

१०. संकेतकांच्या देखभाल दुरूस्तीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देणे, शहरात सुसज्य कार्यालय उभारणे एजन्सीला बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे अटी शर्तींच्या अधीन खाजगी अभिकर्ता नेमूण बी.ओ.टी. तत्वावर LED Lamp head असलेले व Solar Energy वर चालणारे अत्याधुनिक वाहतूक संकेतके बसविल्याने प्रतिवर्ष होणाऱ्या खर्चात बचत होईल तसेच महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीला द्यावे लागणारे वीज देयक द्यावे लागणार नाही तर उलट अ.क्र.४ मध्ये तरतुद केल्यानुसार Digital display boards च्या प्रसारीत होणाऱ्या जाहीरातीच्या पोटी महानगरपालिकेस एजन्सीकडून काही प्रमाणात उत्पन्न प्राप्त होईल.

तरी वरील प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व २६ पारंपारीक वाहतूक संकेतकाऐवजी खाजगी अभिकर्ता नेमूण बी.ओ.टी. तत्वावर LED Lamp head असलेले व Solar Energy वर चालणारे अत्याधुनिक वाहतूक संकेतके बसविणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व २६ पारंपारीक वाहतुक संकेतका ऐवजी खाजगी अभिकर्ता नेमुन बी.ओ.टी. तत्वावर LED Lamp head असलेले व Solar Energy वर चालणारे अत्याधुनिक वाहतूक संकेतके बसविणेसाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विविध मुख्य रस्त्यावर तसेच वार्डातील मुख्य रस्त्यावर पथदिवे लावण्यासाठी बरीच कामे निविदा अंतर्गत व मंजुरी अंतर्गत आहेत. ज्यामध्ये उर्जा बचतीचे दिवे (Energy saving fitting) यात एकुण १४०० फिटींग आहेत. त्यात ६५० फिटींग २×२४ वॅट च्या आहेत व ७५० फिटींग ५×२४ वॅट च्या आहेत. सन २००६-०७ च्या दरसुचीमध्ये २×२४ वॅट फिटींगचे दर नमुद केलेले आहेत. मात्र ५×२४ आणि४×२४ वॅट च्या फिटींगचे दर सुचीमध्ये नमुद नाही. त्यामुळे यासाठी एशियन इलेक्ट्रीक कंपनी यांचे कडून दरपत्रक मागविले असता, त्यांनी५×२४ वॅट एनर्जी सेव्हींग फिटींगच्या दराचे कोटेशन दिलेले आहे. व त्यानुसार सर्व अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

परंतु अंदाजपत्रकातील दर जास्तीचे वाटप असल्याने उत्पादक कंपनी मार्फत एनर्जी सेव्हींग फिटींग मागविल्यास स्पर्धात्मक दर प्राप्त होऊन महानगरपालिकेला आर्थिक फायदा होईल असे वाटते. तसेच कामाचा दर्जाही चांगला राखता येईल. यासाठी सर्व मंजुर अंदाजपत्रकातील एकुण १४०० नग उर्जा बचत फिटींगचे अंदाजपत्रक र.रू.९०,९६,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. तरी सदरील एनर्जी सेव्हींग फिटींगची खरेदी एकत्रीतपणे करून, कार्यालयातर्फे सर्व मंजुर कामांसाठी पुरवठा करण्यात येईल व कामे करून घेण्यात येतील. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासनाने हे चांगले काम केले आहे. या कामामुळे एखाद्या वार्डात किती एनर्जी सेव्हींग झाली व त्यामुळे किती बील वाचले याचीही माहिती देण्यात यावी. विषयाच्या पॅराग्राफ २ मध्ये ''परंतु अंदाजपत्रकातील दर जास्त वाटत असल्याने उत्पादक कंपनी मार्फत एनर्जी सेव्हींग फिटींग मागवावी'' असे म्हटलेले आहे. ती अट काढावी एखादा विक्रेता टेंडर भरत असेल तर याकडूनही फिटींग घेण्यात यावी. आपल्याकडे साठ हजार फिटींग पडलेल्या आहेत त्या कशाप्रकारे वापरणार याचाही प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.विनायक पांडे : शहरात एनर्जी सेव्हींग फिटींग लावल्यानंतर येणारे बील व सोडीयम फिटींगमुळे येणारे बिल यात बचत किती झाली याचा प्रथमत: प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभि.(ड्रे.वि.) : उत्पादक कंपनीकडून डायरेकली फिटींग मागवायची व त्या कॉन्ट्रॅक्टरला सप्लाय करावयाच्या अशा आशयाचा हा प्रस्ताव आहे. कंपनीकडूनच फिटींग खरेदी केल्यानंतर त्याचा फायदा मनपास होईल. सध्या ५००० फिटींग लावलेल्या आहेत.सर्व दिवे लावल्यानंतर बील येईल. त्यानंतर एनर्जी किती सेव्हींग झाली हे समजेल. परंतु पुर्वी आपण २५० वॅटचे दिवे वापरत होतो. नवीन फिटींग ९६ वॅटचे आहेत. त्यामुळे सेव्हींग होणारच आहे. तरीही ५० ते ६० टक्के एनर्जी सेव्हींग होऊ शकते. कमीत कमी ४० टक्के एनर्जी सेव्हींग झाली पाहिजे ही आपली अटच आहे त्याशिवाय बिल दिले जाणार नाही.

श्री.वसंत नरवडे पाटील : मागील सहा महिन्यापासुन हे काम चालु आहे. पुर्वीच्या काढलेल्या फिटींग कोठे वापरण्यात येत आहे. याची माहिती द्यावी. काही ठिकाणी दिवसभर लाईट चालु असतात तर काही ठिकाणी ५.०० वाजताच बंद होतात. यावर नियंत्रण हवे नवीन फिटींगमुळे किती बचत झाली याची माहिती द्यावी. ज्या ठिकाणी हायमस्ट लावलेले आहेत त्यशा ठिकाणी या फिटींगचा वापर करण्यात येईल का याची माहिती द्यावी. स्पर्धा होणार आहे की त्याच कंपनीस आपण बीओटी वर देणार आहोत. नगर सेवक स्वेच्छा निधीतून होणारी कामे व या मधुन केली जाणारी कामे याचा ताळमेळ लावण्यात यावा.

मा.आयुक्त : स.नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीतुन एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्याची मागणी येत आहे. यासाठी एकत्रीत टेंडर काढण्यात येत आहे. यामुळे कमीत कमी १५-२० टक्के फायदा होईल. यामुळे वेळही वाचेल आपण जे काय बीओटी वर केलेले आहे. त्यात कमीत कमी ४० टक्के एनर्जी सेव्हींग झाली तर आपण ते बील अदा करावयाचे आहे. बीओटीचे प्रयोजन वेगळे आहे.

श्री.वसंत नरवडे पाटील : येत्या आर्थिक वर्षामध्ये विद्युत विभागासाठी आपण किती बजेट ठेवणार आहोत. स्वेच्छा निधिचा पैसा किती येणार.

कार्यकारी अभि.(ड्रे.वि.) : स्वेच्छा निधितुन जास्तीत जास्त मागणी आली तर बचत होईल.

श्री.गजानन बारवाल : विद्युत दिव्यांसाठी बसवलेले टायमर बरोबर चालत नाहीत या फिटींग मुख्य रस्त्यावर बसवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु मुख्य रस्त्याऐवजी छोट्या रस्त्यावरही या फिटींग लावलेल्या आहेत. मुख्य रस्ता म्हणजे काय ५०',६०' की १०',२०' किती रूंदीचा रस्ता समजावा.

मा.आयुक्त : स.नगर सेवक स्वेच्छा निधीतुन सांगतील त्या ठिकाणी लावण्यात येतील. बीओटी प्रोजेक्ट मधुन लावलेले दिवे हे २४० वॅटचे काढून लावलेले आहेत. जेथे २४० वॅटचे दिवे नाहीत तेथे बीओटी मधुन लावता येणार नाहीत. दिवे लावणे व बंद करण्याच्या वेळा कंत्राटदाराने पाळावयाच्या आहेत. अपेक्षीत वेळेपेक्षा जास्तवेळ दिवे चालले तर त्याचे बील कॉन्ट्रॅक्टरला द्यावे लागेल. कॉन्ट्रॅक्टरने बीओटी मधुन किती वॅटचे व किती दिवे लावलेले आहेत हे माहित आहे.त्यामुळे अपेक्षीत तासाच्यावर दिवे चालु राहिल्यास त्याचे बील कॉन्ट्रॅक्टरला द्यावे लागेल.

श्री.सलीम खान : आता आपण ज्या फिटींग घेत आहोत त्यामुळे बीओटी चे काम संपणार आहे काय. या फिटींग कोठे कोठे लावणार.

श्री.जेजुरकर : हा प्रस्ताव अत्यंत चांगला आहे. यामुळे मनपाचे सेव्हींग होणार आहे. यापुर्वी जे टेंडर काढण्यात आलेले होते त्याचे काय होणार.

मा.आयुक्त : काढलेले टेंडर वीथ फिटींग होते त्या टेंडरचे काम पुर्ण होईल यानंतर जे येतील ते टेंडर फिटींग सोडून काढण्यात येतील.

श्रीमती खान मेहरून्नीसा : एजंसीला १० लाखाचे टेंडर दिलेले आहे. परंतु लावलेले लाईट नेहमी नेहमी बंद पडतात आपल्या लोकांनीच हे काम करावे.

श्रीमती रजनी जोशी : यामुळे मनपाचे उत्पन्नात सेव्हींग होणार आहे. परंतु कॉन्ट्रॅक्टर बरोबर काम करत नाही. पाण्याच्या टाकलेल्या लाईनचा अनुभव वाईट आहे.

श्री.संजय शिरसाठ : प्रत्येक नगर सेवकांनी त्यांच्या वार्डातील कामे अर्थसंकल्पात टाकली होती त्या कामाचे टेंडर होऊन एजन्सी फिक्सींग पर्यंत प्रक्रिया झाली होती. मनपाच्या अधिकाऱ्यांना असे वाटले की डीएसआर रेट जास्त आहेत मात्र प्रत्यक्षात फिटींग कमी रेट मध्ये मिळते. माझ्या माहिती प्रमाणे काही लोकांना दिलेली वर्क ऑर्डर परत घेण्यात आलेली आहे. डीएसआर रेट एका फिटींगचा ४६९७ रूपये आहे परंतु प्रत्यक्षात बाजारात ती २७०० रूपयात मिळते ही तफावत भरून काढण्यासाठी हा प्रस्ताव आलेला आहे. सिमेंटचे रेट वाढले तरी आपण डीएसआर रेट प्रमाणेच घेतो. प्रत्येक नगर सेवकाच्या वार्डात पेव्हींग ब्लॉक बसविण्यात येत आहत. १०-१५ लाखाचे पेव्हींग ब्लॉक आहेत. मनपासमोर टाकलेल्या नुसार पेव्हींग ब्लॉक मनपानेच घेवुन सप्लाय करावेत. त्याची क्वॉलिटी एकच ठेवण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : हा प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही प्रत्येक वार्डात बसाववयाच्या पेव्हींग ब्लॉकच्या प्रस्तावासही मंजुरी देण्यात यावी.

श्री.रशिद खान(मामु) : काही ठिकाणी लाईट लावेलेले असले तरी ते चालू नाही. त्याची सेव्हींग कशी होणार काही ठिकाणी कॉन्ट्रॅक्टरने डायरेक्ट लाईनवरूनच सप्लाय घेतलेला आहे. याबाबत मी तक्रारही केलेली आहे हे फिटींग कोण लावणार मनपा की आपले लाईनमन. कॉन्ट्रॅक्टरला हे काम दिले तर आपल्याकडील ३०-३५ लाईनमन काय काम करतील. मनपा ने रिक्षा व शिडया घेऊन त्या लाईनमनला द्याव्यात ज्यांना वर्क ऑर्डर दिल्या आहेत त्यांच्या कामाचे काय.

श्री.भगवान घडमोडे : मागच्या बजेटची कामे आजपर्यंत झालेली नाही. यामुळे नागरीकांचा रोष स.नगर सेवकांना पत्करावा लागतो. काही कामे निविदे अंतर्गत आहे असे प्रस्तावात म्हटलेले आहे. अशा वेळेस वेगवेगळे ठराव आणुन प्रशासन कामात खोडा घालत आहे. म्हणून हा ठराव रद्द करावा. पेव्हर ब्लॉकच्या कामासही मंजुरी देणार आहात काय.

मा.महापौर : स.नगर सेवकांच्या भावना लक्षात घेता ज्या कामाच्या वर्क ऑर्डर काढलेल्या आहेत त्या कंटीन्यु करण्यात येतील ज्या ठिकाणी वर्क ऑर्डर दिलेल्या नसतील किंवा टेडर निघालेले नसेल त्याबाबत ती कामे एकत्र करून टेंडर काढावे. सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सर्व मंजुर अंदाजपत्रकातील एकुण १४०० नग उर्जा बचत फिटींगचे अंदाजपत्रक र.रू.९०,९६,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच ज्या कामाच्या वर्क ऑर्डर काढलेल्या आहेत त्या कंटीन्यु करण्यात याव्यात ज्या ठिकाणी वर्क ऑर्डर दिलेल्या नसतील किंवा टेंडर निघालेले नसेल त्या बाबत ती कामे एकत्र करून टेंडर काढण्यात यावे. यासह सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ७०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जूनी ड्रेनेज लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे. या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा. विभागाच्या सन

२००५-०६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रक र.रू.१३,००,०००/- होत आहे. सदरील काम महाराष्ट्र शासनाच्या नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र. / पूरक/विधयो/१०२००६/ प्र.क्र.१२/२००६/नवि-४/ मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च , २००६ सहपत्रावरील अ.क्र. १२४ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेस र.रू.१६७.५८ लक्ष उपलब्ध झालेल्या तरतुदीतून प्रस्तावित आहे. अ.प.र.रू.१३,००,०००/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जूनी ड्रेनेज लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.१३,००,०००/- चे अंदाजपत्रकास मा न्यता देण्यात येवून सदरील काम महाराष्ट्र शासनाच्या नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र. / पूरक/विधयो/१०२००६/ प्र.क्र.१२/२००६/नवि-४/ मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च , २००६ सहपत्रावरील अ.क्र. १२४ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेस र.रू.१६७.५८ लक्ष उपलब्ध झालेल्या तरतुदीतून खर्च करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागात सध्यस्थितीत जवळपास एकुण १००० पथदिवे आहे. सदर पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिका फंडातून करण्यात येते. या कामी अर्थ संकल्पात निधीची तरतुद करावी लागते तसेच सदर पथदिव्यांच्या विद्युत बिला पोटी महानगरपालिका महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस देयके अदा करते.

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यांचे परिपत्रक क्र. संकीर्ण २००५/११४/इमा.३ दिनांक २३.०३.२००६ नुसार सध्या वापरात असलेली विद्युत उपकरणे जुन्या तंत्रज्ञानावर आधारीत असल्याने, होणाऱ्या विजेचा अपव्यय टाळण्यासाठी शासकीय/निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यात उर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर करणे बाबत सुचविले आहे.

महानगरपालिकेमार्फत शहरातील अस्तीत्वातील पथदिव्यांपैकी ५००० पथदिव्यांच्या जागी Energy saving (शुभ्र प्रकाश देणारे दिवे) प्रकारचे दिवे लावण्याचे काम मे.विन वॉक सिस्टीम, नाशिक यांना सात वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आलेले आहे. यामध्ये विजबिलात होणाऱ्या बचतीतमधून मे.विन वॉक सिस्टीम, नाशिक त्यांचा खर्च परस्पर काढून घेऊन महानगरपालिकेस निविदेतील स्पर्धात्मक दरानुसार हिस्सा देणार आहेत.

चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागात ४×२४W चे Energy Efficient दिवे स्वखर्चाने लावणे व दहा वर्षापर्यंत या दिव्यांची देखभाल स्वखर्चाने करणे, तसेच एनर्जी सेव्हींग लाईट लावल्यानंतर येणारे १००० दिव्यांचे एनर्जी बिला मध्ये पॉवर फॅक्टर ०.९५ पेक्षा कमी राहणार नाही तसेच हमखास एनर्जी सेव्हींग होईल या बाबत दक्षता घेणे इत्यादी कामे करून त्या पोटी प्रतिमाह प्रती दिवा (Pole) सुरूवातीस स्वखर्चाने लावलेल्या दिव्यांचा खर्च तसेच दिव्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी जी एजन्सी महानगरपालिकेकडून प्रतिमाह कमीत कमी रक्कम आकारेल व उत्कृष्ट सेवा देण्याची हमी देईल त्यास या भागाचे दिवे लावण्याचे काम देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. यासाठी खालील प्रमाणे अतिरिक्त अटी/शर्ती राहतील.

१. सदर कामाचा करारनामा हा दहा वर्षा करीता राहील. या कालावधी नंतर कंत्राटदार/कंपनी सर्व पथदिवे महानगरपालिकेस हस्तांतर करतील.

२. या कामाअंतर्गत सर्व स्ट्रीट लाईट फिक्चर्स बदलून त्या ठिकाणी एजन्सी स्वखर्चाने Energy saving फिक्चर्स लावील.

३. रस्त्यावर रात्रभरUniform light राहील याची खबरदारी एजन्सीस घ्यावी लागेल.

४ पॉवर फॅक्टर योग्य राहील .(०.९५ पेक्षा कमी असणार नाही)

५. सर्व लाईट उत्कृष्ट प्रतीचे राहतील , जेणे करून नागरीकांना त्रास होणार नाही.

६ जर फिक्चर दुरूस्त करणे झाल्यास (संपुर्ण Contract period मध्ये) ते दुरूस्त करून अथवा बदलुन द्यावे लागतील त्यासाठी महानगरपालिका मोबदला देणार नाही.

७. एजन्सीने स्वत:चे एनर्जी सेव्हींग पथदिवे लावल्यानंतर महानगरपालिकेचे पुर्वीचे दिवे हे महानगरपालिका भांडारात एजन्सी तर्फे जमा करण्यात येतील.

८ दिवे बदलतांना दिवे सुरू करण्यासाठी इतर किरकोळ दुरूस्त्या यामध्ये केबल दुरूस्ती, चोक बदलणे जंक्शन बॉक्स सुस्थितीत नसल्यास तो सुस्थितीत ठेवणे इत्यादी देखभाल दुरूस्तीची काम कंपनीस स्वखर्चाने करावी लागतील.

९. एजन्सीस आपले स्वत:चे कार्यालय औरंगाबाद शहरात उघडावे लागेल. आवश्यक तो तांत्रीक/अतांत्रिक कर्मचारी वर्ग ठेवावा लागेल. कार्यालयात दुरध्वनीची व्यवस्था, तसेच २४ तास तक्रार ऐकून घेण्यासाठी shift wise कर्मचाऱ्यांची नोंद करावी लागेल.

१०. ४८ तासांचे आत तक्रारीचे निवारण झाले पाहिजे. तक्रार आल्यानंतर तक्रारीस क्रमांक देवून त्या तक्रार निवारणा विषयी दररोज अहवाल महानगरपालिकेस सादर करावा लागेल.

११. या भागातील १०० % दिवे सुरू राहतील, याची जबाबदारी एजन्सीची असेल.

१२. दिव्यांची चोरी, नुकसान (Except natural calamities and unavoidable circumstances) याची जबाबदारी कंपनीची असेल.

१३. एजन्सीला स्वखर्चाने संपूर्ण दिव्यांच्या खाबांचे सर्वेक्षण करून, सर्व खांबावर ऑईल पेंटने क्रमांक द्यावे लागतील.

१४. सध्या पथदिव्यांच्या सर्व मिटर्सची तपासणी एजन्सीने स्वखर्चाने करावी. बिघडलेले मिटर्स महाराष्ट्र विज वितरण कंपनीकडून दुरूस्त करून घेणे किंवा बदलून दुसरे लावणे ही कामे कंपनीस करावी लागतील.

१५. एजन्सीने हे काम Lux Parameters आणि पथदिव्यांच्या सध्याच्या खांबांची उंची न बदलता करणे बांधनकारक राहील.

१६. संबंधीत एजन्सीला या कामांतर्गत वापरण्यात येणाऱ्या साहित्यासाठी नियमाप्रमाणे जकात कर महानगरपालिकेकडे नियमीतपणे भरणा करावा लागेल, त्यात कोणतीही सुट मिळणार नाही.

१७. एजन्सीने तक्रार प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांचे आत तक्रार दूर केली पाहीजे. अन्यथा ज्या खांबांवरील पथदिव्याची तक्रार असेल, त्याबाबत विलंब झालेल्या प्रत्येक दिवसासाठी प्रती खांब रूपये १००/- दंड आकारण्यात येईल.

१८. निविदा पूर्व बैठकीच्यावेळी आवश्यकतेनुसार अटी शर्तीत बदल करणे/ वाढ करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागात ४×२४W चे Energy Efficient दिवे स्वखर्चाने लावणे व दहा वर्षापर्यंत या दिव्यांची देखभाल स्वखर्चाने करणे, तसेच एनर्जी सेव्हींग लाईट लावल्यानंतर येणारे १००० दिव्यांचे एनर्जी बिला मध्ये पॉवर फॅक्टर ०.९५ पेक्षा कमी राहणार नाही तसेच हमखास एनर्जी सेव्हींग होईल या बाबत दक्षता घेणे इत्यादी कामे करून त्या पोटी प्रतिमाह प्रती दिवा

(Pole) सुरूवातीस स्वखर्चाने लावलेल्या दिव्यांचा खर्च तसेच दिव्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी जी एजन्सी महानगरपालिकेकडून प्रतिमाह कमीत कमी रक्कम आकारेल व उत्कृष्ट सेवा देण्याची हमी देईल त्यास या भागाचे व सिडको भागातील दिवे लावण्याचे काम प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अतिरिक्त अटी/शर्ती सह देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७११ :**

सहाय्यक संचालक,नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार ४०.०० मीटर रूंद प्रस्तावित आहे. उक्त रस्त्याचा भाग हॉलिडे कॅम्प ते रेल्वे क्रॉसिंग पर्यंतचा रस्ता विकसीत करावयाचा आहे. उक्त रस्त्याचा विकास औरंगाबाद एकात्मिक रस्ते विकास योजना अंतर्गत अतिरिक्त शहर अभियंता विभागामार्फत करण्यात येणार आहे. उक्त रस्त्याचा विकास उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार ४०.०० मीटर रूंदीसाठी करणे आवश्यक आहे. या ठिकाणी रहदारीची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने अस्तित्वातील रस्ता रहदारीस अपूरा पडत आहे. करीता उक्त रस्त्याचे ४०.०० मीटर रूंदीसाठी रस्त्यात बाधीत क्षेत्राचे भूसंपादन तातडीने करणे आवश्यक आहे. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी उक्त रस्त्यात बाधीत क्षेत्राच्या मिळकत धारकांची बैठक घेवून बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यासंबंधी चटई क्षेत्र निर्देशांक, खाजगी वाटाघाटीने किंवा पैशाच्या स्वरूपात मोबदला घेवून बाधीत क्षेत्राचे महानगरपालिकेस हस्तांतर व ताबा देण्याचे आव्हान केलेले आहे. त्यानुसार शहर अभियंता विभागाकडून कार्यवाही चालू आहे. परंतू काही मिळकतीमधील भाडेकरू व मिळकतधारक यांच्यामध्ये वाद असल्याने मिळकतीच्या बाधीत क्षेत्रांचे हस्तांतर / ताबा घेणे अडचणीचे झाले आहे.

करीता उक्त रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भूसंपादन तातडीने करणेसाठी रितसर भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे जरूरीचे आहे.

करीता उक्त रस्त्यात बाधीत क्षेत्राच्या भूसंपादनाचा प्रस्ताव भूसंपादनाच्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

श्री.अ.साजेद : शहराचा डेव्हलमेंट प्लान्ट १९७५ मध्ये मंजुर झालेला आहे. त्यातील काही रस्त्यांचा प्रस्ताव आजही तसाच आहे. चेलीपुरा ते रोशनगेट रोड कलेक्टर ऑफीस ते शहागंज रोड सराफा ते सिटी चौक रोड, सिटीचौक ते भडकलगेट रोड या रस्त्यांचे अद्यापही ॲक्वीझेशन झालेले नाही.चेलीपुऱ्यातील प्रॉपर्टीचे ॲक्वीझेशन होणे आहे. ही कामे केव्हा होणार हा ठराव रद्द करावा.

मा.आयुक्त : रेल्वे ओव्हरब्रीज नंतर वाहतुकीस मोठी खीळ बसते रेल्वे स्टेशन समोरील रस्ता रूंद करणे आवश्यक आहे कारण तो शहराचा इंन्ट्री पॉईंट आहे. बाधीत मिळकत धारकांना टीडीआर व चटई क्षेत्र निर्देशांकची सवलत देण्यात येईल. ज्यांना ही सवलत नको असेल त्यांना मावेजा देण्यात येईल. रस्ता रूंदीकरण होणे आवश्यक आहे.

श्री.गजानन बारवाल : बाबा पेट्रोलपंप ते रेल्वेस्टेशन हा रस्ता घेण्यात यावा.

श्री.सलीम खान : या विषयावर मला काही बोलावयाचे आहे.

मा.महापौर : सध्या ठराव स्थगित ठेवण्यात येतो पुढील वेळी बाबा पेट्रोलपंप ते रेल्वेस्टेशन हा सुध्दा प्रस्ताव ठेवावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव सध्या स्थगित ठेवण्यात येऊन पुढच्या वेळेस बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन हा सुध्दा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**विषय क्र. ७१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,श्रेयनगर,क्रांतीचौक प्रभागा अंतर्गतच्या भागातील रस्त्याचे दुरूस्तीसह पुनर्डांबरीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचा अंदाजीत खर्च रू.२५,८३,६३३/- एवढा आहे.

तरी २५,८३,६३३/- खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्रेयनगर,क्रांतीचौक प्रभागा अंतर्गतच्या भागातील रस्त्याचे दुरूस्तीसह पुनर्डांबरीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचा अंदाजीत खर्च रू.२५,८३,६३३/- या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१३ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बायजीपूरा (रहेमा मस्जीद) ते एम.जी.एम. रस्त्याचे (भागश:) आधुनिकिकरण करणे, काँक्रीट रस्ता बांधणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या दरसूचीनूसार अंदाजपत्रक रक्कम रू.३४,३७,६००/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००६-०७ या आर्थिक वर्षात स्लम विभागात स्लम नवीन काँक्रीट रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे व मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.३४,३७,६००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,बायजीपूरा (रहेमा मस्जीद) ते एम.जी.एम. रस्त्याचे (भागश:) आधुनिकिकरण करणे, काँक्रीट रस्ता बांधणेच्या कामाचे रू.३४,३७,६००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन या कामाचा खर्च सन २००६-०७ या आर्थिक वर्षात स्लम विभागात स्लम नवीन काँक्रीट रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हिमायतबाग व गायमुख येथे पाणी पुरवठा करण्यासाठी हरसिध्दी सोसायटी येथील जलकुंभ ते हर्सुल कारागृहा लगतच्या जलकुंभापर्यंत २५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.७ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन २००५-२००६ च्या दरसुची नुसार र.रू.२१,५८,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा सर्व खर्च हा भांडवली कामे ह्या लेखा शिर्षका मधुन करण्यात येणार आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक र.रू.२१,५८,०००/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिमायतबाग व गायमुख येथे पाणी पुरवठा करण्यासाठी हरसिध्दी सोसायटी येथील जलकुंभ ते हर्सुल कारागृहा लगतच्या जलकुंभापर्यंत २५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.७ जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठीचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन २००५-२००६ च्या दरसुची नुसार र.रू.२१,५८,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येवून सदरील कामाचा खर्च हा भांडवली कामे हया लेखा शिर्षकामधून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेने आपल्या स्तरावर फक्त शालेय विद्यार्थ्यांना ए.एम.टी. बसेस मधून शाळेत जाण्या येण्यासाठी ५०% सवलतीचे पासेस देण्याचे निर्देश अकोला प्रवासी व मालवाहतूक सहकारी संस्थेस दिलेले आहेत.

तथापी कु.मंगल मधुकर जगदाळे या अंध महाविद्यालयीन विद्यार्थीनीस ए.एम.टी. बस पासची सवलत देण्याची शिफारस मा.महापौर, महानगरपालिका औरंगाबाद यांनी केली आहे.

करीता सदरील अंध महाविद्यालयीन विद्यार्थीनीस ए.एम.टी. बस पासची सवलत देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिकेने आपल्या स्तरावर फक्त शालेय विद्यार्थ्यांना ए.एम.टी. बसेस मधून शाळेत जाण्या येण्यासाठी ५०% सवलतीचे पासेस देण्याचे निर्देश अकोला प्रवासी व मालवाहतूक सहकारी संस्थेस दिलेले आहेत. तथापी कु.मंगल मधुकर जगदाळे या अंध महाविद्यालयीन विद्यार्थीनीस ए.एम.टी. बस पासची सवलत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद सिडको अधिसुचित भागातील सेवा सुविधाचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे दिनांक १ एप्रिल २००६ पासुन हस्तांतरण झालेले आहे.सिडको भागातील विविध सोसायटी / सहकारी गृहनिर्माण संस्था (Self Development) संस्थे मधील विविध अडी अडचणी व समस्या बाबत तसेच तेथील विकास कामे करण्याबाबात दिनांक ३०/९/२००६ रोजी वार्ड अभियंता सिडको (वार्ड ब) यांच्या कार्यालयात बैठक झाली. या बैठकीसाठी सिडको भागातील सर्व सं. नगरसेवक/सं.नगरसेविका तसेच आयुक्त, शहर अभियंता ,सहाय्यक संचालक नगररचना व इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सिडको परिसरातील सर्व(Self Development)सोसायटी मधील उर्वरीत जी विकास कामे करावयाची आहे. त्या साठी लागणारा खर्च हा सोसायटी मध्ये जी कामे शिल्लक आहे. त्या साठी येणारा खर्च हा (Betterment Charges च्या Proportionate) वसुल करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले हे काम पुर्ण करण्यापुर्वी त्या सोसायटीतील अध्यक्ष/सचिव यांनी त्यांच्या सोसायटी मधील खुल्या जागा व रस्ते महानगरपालिकेकडे रितसर नियमानुसार हस्तांतरीत कराव्यात.

सिडको परीसरातील सर्व (Self Development)सोसायटी मध्ये पाण्याचे ड्रेनेजचे तसेच विद्युतचे जवळपास सर्व कामे झालेली आहे. त्यानुसार फक्त अंतर्गत रस्त्यांचे (४.०० मी) रूंदी पर्यंतचे खडीकरण आणि डांबरीकरणाचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात यावे त्यासाठीची एक फिक्स रक्कम सोसायटी कडून वसुल करावी तसेच ही येणारी रक्कम एकदम वसुल न करता प्रत्येक प्लॉट धारकाच्या मालमत्ता करामध्ये

आकारण्यात यावी.अशी मागणी वरील बैठकीत स.नगरसेवक/नगरसेविकांनी केली होती. स.नगरसेवक/नगरसेविकांच्या उपरोक्त भावना विचारात घेता उपरोक्त बाबीस प्रशासनातर्फे सहमती दर्शविण्यात आली आहे.

सध्याच्या प्रचलीत धोरणानुसार महानगरपालिकेतर्फे भुखंडधारका कडून भुखंडक्षेत्रावर रू.१४० प्रती चौ.मी. दराने विकास खर्च आकारला जातो.

करीता सिडको परिसरातील सिडको परिसरातील सर्व(Self Development) सोसायटी मधील उर्वरीत जी विकास कामे करावयाची आहे. त्यासाठी लागणारा खर्च हा सोसायटी कडून Betterment Charges चार्जेस दर रक्कम रू.१४०/- प्रती चौरस मीटर प्रमाणे जी जी कामे करावयाची आहे. त्यासाठी लागणारा खर्च हा Betterment Charges च्या Proportionate मध्ये वसुल करून येणारी रक्कम प्रत्येक भुखंडधारकाच्या मालमत्ता करात आकारणी करून वसुल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय होण्यास्तव तसेच या सोसायटीज मधील प्रस्तावाना प्रशासकीय मान्यता समजण्यात यावी. प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.काशिनाथ कोकाटे : ज्या वेळी सिडको भागाचे मनपाकडे हस्तांतरण झाले त्यावेळी सिडको हडको भागात ज्या सुविधा देणे बाकी आहे. त्या सुविधा १५ कोटी मधुन देणार आहोत असे ठरले होते त्यामुळे नागरीका कडून विकास कर घेणे योग्य होणार नाही तो त्यांच्यावर अन्याय होईल तेव्हा १५ कोटीमधुन हा खर्च करण्यात यावा.

मा.महापौर : विकास शुल्क न घेता १५ कोटीमधुन खर्च करण्यात यावा. हा विषय सिडको पुरता मर्यादीत आहे.

श्री.संजय शिरसाठ : यावर प्रशासनाचे मत घेण्यात यावे. यात एक दुरूस्ती करण्यात यावी. गादीया विहारकडे अनेक बिल्डर्सने सेल्फ डेव्हलपमेंन्ट च्या नावाखाली सोसायट्या केलेल्या आहेत. आज त्या ठिकाणी रस्ते लाईट नाहीत. सिडकोचे काम १५ कोटीमधुन करण्यात यावे. उर्वरीत काम अर्थसंकल्पातुन करण्यात यावे शहरात इतरत्रही अशा सोसायट्या तयार झालेल्या आहेत त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करावी. शहर व सिडको असा मतभेद करू नये.

मा.महापौर : १५ कोटी रूपये सिडकोमध्ये खर्च करण्यात यावेत. सेल्फ डेव्हलपमेंट च्या ज्या सोसायट्या आहेत त्यांनी कंम्प्लेशन सर्टीफिकेट घ्यावे. सिडकोच्या जुन्या सोसायट्यां आहेत त्यांचे कडून विकास शुल्क घेऊ नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सिडको भागात ज्या ठिकाणी विकास शुल्क घ्यायचा त्याठिकाणी शासनाकडून मिळालेल्या १५ कोटी मधुन खर्च करण्यास आणि सिडकोच्या जुन्या गृहनिर्माण संस्थांसाठी विकास शुल्काची आकारणी करू नये आणि शहरातील (Self Development) च्या सोसायट्यांनी कंम्प्लीशन घेणे आवश्यक आहे असे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.संतोष खेंडके : शहरासाठी लागु करावे.

**विषय क्र. ७१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२६ गणेशनगर येथील विविध स्वयं: विकसित गृहनिर्माण संस्थेअंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.२४,९६,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा

खर्च २००६-०७ या आर्थिक वर्षात हे नवीन डांबरी रस्ते (सिडको) या लेखाशिर्षांतर्गत पान क्र.डब्ल्यु-१६६ वरील रक्कम रू.२५.०० लक्ष मधून प्रस्तावित करण्यात आलेले आहे. यासाठी मा.सर्वसाधारण सभेने दि.११.०१.२००७ च्या सभेत ठराव क्र.६७५ अन्वये पारीत केलेला आहे.

तरी सदर कामाचा अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संतोष खेंडके : हा विषय मंजुर करण्यात येऊ नये.प्रथमत: संपुर्ण शहरासाठी धोरणात्मक निर्णय ठरवावा. अन्यथा संपुर्ण शहरासाठी अशा पध्दतीने काम करावे लागेल. संपुर्ण शहरासाठी धोरण ठरवावे लागेल.

सौ.लता दलाल : विषय क्र.३ व १७ सारखेच आहेत. विषय क्र.३ मंजुर करतानाच आपण म्हटले होते की, विषय क्र.१७ च्या निर्णयाप्रमाणे हा विषय मंजुर होईल. सिडकोच्या स्वयंविकसीत सोसायट्या आहेत. त्यांच्यासाठी तरतुद आहे. शहरातील सोसायट्यांना आपण हा निर्णय लागु करणार आहोत का?सर्व साधारण सभेने धोरणात्मक निर्णय घ्यावे एकाही सोसायट्यांना अपवाद ठेऊ नये. धोरणात्मक निर्णय ठरवतांना दोन्ही ठरावांना मंजुरी द्यावी.सर्व बाजुंनी विचार करून मंजुरी द्यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : मागील वर्षी सिडको हडकोचे मनपाकडे हस्तांतरण झालेले आहे. त्या भागास आपण १५ कोटीमधुन सुविधा देणार आहोत. त्यामुळे नागरीकांकडून विकास कर घेणे योग्य होणार नाही. या विषयावर आपण काय निर्णय घेतला याची माहिती सभागृहास द्यावी.

मा.महापौर : सिडकोसाठी हा ठराव मंजुर करण्यात येत आहे तसेच ज्या प्रकरणात भोगवटा प्रकरणात भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले आहे. तेथे विकास शुल्क घेऊ नये. तसेच शहरामध्ये नागरीकांनी ज्या लिगल गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या असतील व भोगवटा प्रमाणपत्र घेतले असेल त्या सोसायट्याकडून विकास शुल्क घेण्यात येऊ नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेप्रभाग क्र.२६ गणेशनगर येथील विविध स्वयं: विकसित गृहनिर्माण संस्थेअंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेचे कामाचे र.रू.२४,९६,४००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे शहरात भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले असेल तर अशा सोसायट्यांकडून विकास शुल्क घेऊ नये यासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२४, वर प्रभाग क्रमांक ०९ भिमनगर भावसिंगपुरा ते साई खेल प्राधिकरण या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे रक्कम रूपये १५ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतू त्या कामा ऐवजी प्रभाग क्रमांक ०९ अंतर्गत जयसिंगपुरा ते नंदनवन कॉलनी भावसिंगपुराकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सदरील रक्कम रूपये १५ लाख वर्ग करण्यात यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.पुरूषोत्तम ठाकुर अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२४, वर प्रभाग क्रमांक ०९ भिमनगर भावसिंगपुरा ते साई खेल प्राधिकरण या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे रक्कम रूपये १५ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतू त्या कामा ऐवजी प्रभाग क्रमांक ०९ अंतर्गत जयसिंगपुरा ते नंदनवन कॉलनी भावसिंगपुराकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सदरील रक्कम रूपये १५ लाख वर्ग करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७१९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, बन्सीलालनगर येथील मनपाच्या शाळेच्या आवारात क्रिडांगण तयार करणे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अल्पा विकास जैन अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

श्री.गजानन बारवाल : मागील वेळेस आपण मनपाच्या शाळा लग्न अथवा जे काही चांगले कार्य असेल त्यासाठी द्याव्यात असे सभागृहात ठरले होते. हे असुनही मला एक नोटीस मिळालेली आहे. तीन महिन्यापुर्वी लग्नासाठी ही जागा राखीव केली होती ती रद्द केली आहे. बन्सीलाल नगर, पदमपुरा भागातील नागरीक या ठिकाणी लहान मोठे कार्यक्रम घेत असतात ती जागा शाळेला सुट्टी असतांना लग्नासाठी उपलब्ध करून द्यावी.

श्रीमती अल्पा जैन : ही मनपाची जागा आहे यासाठी मुलांना खेळण्यासाठी त्याठिकाणी क्रिडांगण बनवुन द्यावे हे मंगल कार्यालय नाही.मुलांची संख्या कमी होत आहे.

श्री.गजानन बारवाल : रिझर्वेशन नं ९१ ची जागा मी मनपास हँड ओव्हर केलेली आहे त्या ठिकाणी सांस्कृतिक सभागृह बांधावयाचे ठरले होते. परंतु तेथे बॅडमेंटींग हॉल बांधण्यात आले ते आम्हाला सांस्कृतिक व लग्न कार्यासाठी खाली करून द्यावे

मा.आयुक्त : शाळा लग्न कार्यासाठी देऊ नयेत.असा शिक्षण समितीचा ही ठराव आहे. लग्नासाठी शाळा दिल्यानंतर त्याठिकाणी घाण होते दुसऱ्या दिवशी मुलांना ती साफ करावी लागते. शाळेत लग्न कार्यक्रम होऊ नयेत.

श्री.गजानन बारवाल : ज्यांना लग्नासाठी शाळा दिल्या असतील त्यांच्याकडून डिपॉझीट घ्यावे.

श्रीमती डॉ.आशा बिनवडे : मनपाची परवानगी नघेता शाळा परस्पर घेतल्या जातात. आपण येथुन पुढे एकही लग्न लागले तर कुणावर जबाबदारी फिक्स करणार.

मा.आयुक्त : कोणत्याही शाळेत लग्न होऊ नये हे पाहणे ही उप आयुक्तांची जबाबदारी आहे. शाळेत क्रिडांगण करणे ही गव्हर्नमेंट ची पण पॉलीसी आहे.

श्री.संतोष खेंडके पाटील : लग्नासाठी शाळा देणे न देणे हा विषय वेगळा आहे. प्रस्तावित ठिकाणी क्रिडांगण बनविण्यास हरकत नसावी. लग्नासाठी देण्याचा निर्णय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेण्यात यावा.

श्री.साहेबराव कावडे : लग्नासाठी शाळा देऊ नयेत त्या ठिकाणी खुप घाण होते.

मा.महापौर : शाळा लग्नास द्यावयाच्या की नाहीत यासाठी शिक्षण समिती ,सभापती श्री.विजय खुडे यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन करण्यात येते. त्यात त्यांनी २ अधिकारी घ्यावेत व निर्णय घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा : क्रिडांगण बांधणे व लग्न लावण्यासाठी शाळा देणे हे दोन वेगवेगळे विषय आहेत. ते मीक्स करू नका.

श्रीमती अल्पा जैन : लग्नासाठी जागा देणे व क्रिडांगण बांधणे हे दोन वेगवेगळे विषय आहेत. या विषयास मंजुरी द्यावी.

श्री.संजय शिरसाठ : क्रिडांगणासाठी त्यांना लॉन लावावयाची असेल तर त्यास परवानगी द्यावी. शाळेत लग्नाची परवानगी द्यावी किंवा नाही यासाठी तीन जनांची कमेटी स्थापन करा.

श्री.रशिद खान(मामु) : शाळेत लग्न लावणे व क्रिडांगण या दोन वेगळ्या गोष्टी आहेत क्रिडांगणास मंजुरी द्यावी.

श्री.गजानन बारवाल : या ठिकाणी श्री.पोपटलाल,कुंडलवाल यांनी मे महिन्यात बुकींग केली आहे. त्यांना लग्नासाठी देण्यात यावी.

मा.महापौर : त्या भागात क्रिडांगण बांधण्यास मंजुरी देण्यात येते परंतु त्याठिकाणी कोणतीही वास्तु बांधता येणार नाही. तसेच तीन महिन्यापुर्वी श्री.पोपट कुंडलवाल यांना लग्नासाठी शाळा दिलेली आहे. ती त्यांना देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,बन्सीलालनगर येथील मनपाच्या शाळेच्या आवारात क्रिडांगण तयार करणेच्या कामासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते तसेच सभागृहात चर्चा झाल्याप्रमाणे श्री.पोपट कुंडलवाल यांना लग्नासाठी शाळा देण्यासही मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ७२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे मसनतपूर वॉर्ड क्र.२३ संपूर्ण कामगार वस्ती असून कामगारांच्या मुलांना खेळण्याकरीता उद्यान व आरोग्य केंद्रासाठी एम.आय.डी.सी.ची गावाला लागून असलेले प्लॉट क्र.९० व मसनतपूर येथील मनपा शाळे समोरील एम.आय.डी.सी.चा मोकळा प्लॉट खाजगी वाटाघाटीने किंवा भूसंपादन करून ताब्यात घेणे व विकसीत करणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई शिंदे अनुमोदक : श्री.भगवान देविदास घडमोडे

मा.महापौर : शासनाकडून एमआयडीसी तर्फे देण्यात येते . मंजुर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे मसनतपुर येथील एम.आय.डी.सी.ची गावाला लागून असलेले प्लॉट क्र. ९० व मसनतपुर येथील मनपा शाळेसमोरील एम.आय.डी.सी.चा मोकळा प्लॉट खाजगी वाटाघाटीने किंवा भूसंपादन करून ताब्यात घेणे व विकसीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, खिंवसरा पार्क गारखेडा येथील न.भू.क्र.१५७३५/१, १५७३५/२, १५७३५/३ मध्ये अंतिम रेखांकन खिंवसरा नावे मंजूर करण्यात आलेला आहे. सदर

परिसरातील वि.यो.रस्ते विकसीत झालेले असल्याने, अंतर्गत भागातील रस्त्याच्या रचनेत बदल करणे आवश्यक आहे. ज्या योगे नागरीकांची गैरसोय टळून, त्यांना आयोग्य वाहतूकीचा त्रास होणार नाही.

तरी रेखांकनास सुधारित रेखाकंनाचे स्वरूप देणे बाबत संबंधीत नगर रचना विभागास निर्देश व्हावेत. त्या संबंधाने मा.सर्वसाधारण सभेची मान्यता व्हावी.

सुचक : श्री.के.व्ही.मोरे, श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्री.मधुकर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खिवंसरा यांच्या नावे मंजुर असलेल्या खिवंसरा पार्क गारखेडा येथील न.भू.क्र.१५७३५/१, १५७३५/२, १५७३५/३ मध्ये अंतिम रेखांकनातील रहिवाशांची गैरसोय टळावी व अयोग्य वाहतुकीचा त्रास होऊ नये म्हणुन अंतर्गत भागातील रस्त्याच्या रचनेत बदल करणे गरजेचे असल्याने रेखांकनास सुधारीत रेखांकनाचे स्वरूप देण्यास तसेच या संदर्भात नगर रचना विभागाने आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिकेतील स्थायी समितीचे सर्व सदस्यांचा इतर राज्यातील महानगरपालिकांना भेटी देण्याकरीता अभ्यास दौरा आयोजित करावयाचा आहे. यामध्ये नवि दिल्ली, चंदीगढ, अमृतसर,जालंधर या महापालिकांचा समावेश असेल. याकरीता स्थायी समितीचे १६ सदस्य, नगर सचिव व इतर तीन कर्मचारी असे एकुण २० ते २२ व्यक्तींच्या प्रवास दौऱ्यास मंजुरीसाठी आणि या दौऱ्यासाठी लागणाऱ्या प्रवास खर्च, निवास खर्च, भोजन खर्च व इतर प्रसंगानुरूप खर्चास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.रेणुकादास वैद्य,सौ.लता दलाल,श्री.खान मुजीब मीर आलम खान,श्रीमती डॉ.आशा बिनवडे,
श्री.हिम्मतराव दाभाडे, श्री.संजय शिरसाट, श्री.मधुकर सावंत, श्री.विनायक पांडे

अनुमोदक : श्री.रविकांत गवळी,श्री.मिलींद दाभाडे,श्री.दिलीप गायकवाड,श्री.त्र्यंबक तुपे,श्री.पुनमचंद बमणे,
श्री.मो.जावेद मो.इसाक,श्री.हाजी शोरखान,अ.रहेमानखान,श्री.साहेबराव कावडे

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : सदरील प्रस्ताव रद्द करावा.

मा.महापौर : सदर प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ७२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील रंगीन दरवाजा ते अमर प्रित हॉटेल पर्यंत रस्त्यास राष्ट्रमाता जिजाऊ महामार्ग नांव देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, सौ.दलाल लता श्रीनिवास, श्री.रेणुकादास वैद्य,
श्री.तनवाणी किशनचंद, श्री.राजेश व्यास.

अनुमोदक : श्री.संजय रिडलॉन, श्री.गजानन बारवाल, श्री.कटकटे सतिष, श्री.केनेकर संजय

श्री.रशिद खान(मामु) : (अनेक स.सदस्य मा.महापौर यांचे डायस समोर एकत्र येऊन बोलत होते) रंगीन गेट ते पुढे किती मोहल्ले येतात. सराफा पासुन पुढे जो रस्ता आहे त्याभागासाठी मंजुर करावे.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो तसेच यानंतरचे सर्व विषय पुरवणी व ऐनवेळेच्या विषयासह मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील रंगीन दरवाजा ते अमर प्रित हॉटेल पर्यंत रस्त्यास राष्ट्रमाता जिजाऊ महामार्ग नांव देण्यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.१४ रोजेबाग मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१५३ अ.क्र.३ | **नवीन कॉंक्रीट रस्ते** वार्ड क्र.१४ मध्ये कॉंक्रेटींग करणे-१०.०० लक्ष.. सदरील काम रद्द करण्यात यावे. | वार्ड क्र.१४ मध्ये छत्रपती नगर येथे जुनी ड्रेनेज लाईन बदलून नवीन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे-१०.०० लक्ष |

सुचक : श्री.दिलीप गायकवाड अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.१४ रोजेबाग मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आगामी अर्थसंकल्प पुस्तिकात वार्ड क्र.२९ गणेश कॉलनी करीता खालील कामाची तरतुद आहे.

१) वार्ड क्र.२९ मध्ये जलनि:सारण वाहीणी टाकणे पान क्र.डब्ल्यु-१५६ अ.क्र.-१४ वर अंदाजे रक्कम ५.०० लाख

२) वार्ड क्र.२९ मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे पान क्र. डब्ल्यु-१५३ अ.क्र.७ वर अ. रक्कम-७.०० लाख.

उपरोक्त कामे अ.क्र.१ व २ नुसार प्रत्येकी कामातुन एक एक लाख (दोन लाख एकुण):- वार्ड क्र.२९ गणेश कॉलनी मध्ये फरशी दुरूस्ती,खडी रस्ते ,पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनि:सारण कामे व इतर आवश्यकते नुसार फुटकळ कामे- वार्ड कार्यालय ''क'' जाफर गेट कडे वळती-२.०० लाख

सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. मो.जावेद कुरैशी अनुमोदक : श्रीमती मसरत बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,उपरोक्त कामे अ.क्र.१ व २ नुसार प्रत्येकी कामातुन एक एक लाख (दोन लाख एकुण):- वार्ड क्र.२९ गणेश कॉलनी मध्ये फरशी दुरूस्ती,खडी रस्ते ,पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनि:सारण कामे व इतर आवश्यकते नुसार फुटकळ कामे- वार्ड कार्यालय ''क'' जाफर गेट कडे रू.२.०० लाख वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,अर्थसंकल्प २००६ ते २००७ मध्ये विकास कामात ठेवण्यात आलेल्या बजेट मध्ये कामाची तरतुद ठेवण्यात आली होती मागच्या सर्वसाधारण सभेमध्ये हेड चेन्ज करून गांधी नगर वार्डात समाज मंदीर बांधणे कामाची तरतुदला मा.सर्व साधारण सभेत मंजुरी देण्यात आलेली आहे. कामाची रक्कम १०.०० लाख आहे.सध्या त्या कामाची वार्डात गरज नसल्यामुळे त्या कामाऐवजी गांधी नगर वार्डात विविध ठिकाणी कॉंक्रेटींग ब्लॉक बसविणे रक्कम१०.०० लाख करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजु रिडलॉन अनुमोदक :श्री.रविंद्र गांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अर्थसंकल्प २००६ ते २००७ मध्ये विकास कामात ठेवण्यात आलेल्या बजेट मध्ये कामाची तरतुद ठेवण्यात आली होती मागच्या सर्वसाधारण सभेमध्ये हेड चेन्ज करून गांधी नगर वार्डात समाज मंदीर बांधणे कामाची तरतुदला मा.सर्व साधारण सभेत मंजुरी देण्यात आलेली आहे. कामाची रक्कम १०.०० लाख आहे.सध्या त्या कामाची वार्डात गरज नसल्यामुळे त्या कामाऐवजी गांधी नगर वार्डात विविध ठिकाणी कॉंक्रेटींग ब्लॉक बसविणे रक्कम१०.०० लाख रूपयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७१ मधील निरंतर बाग संरक्षण भिंत बांधणे साठी ५.०० लक्ष तरतुद अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु १८३ वर करण्यात आलेली आहे. त्याऐवजी पुंडलिक नगर १०० फुट डी.पी.रोडलगत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी सदरील तरतुद वळती करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.निमगांवकर प्रल्हाद, श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.७१ मधील निरंतर बाग संरक्षण भिंत बांधणे साठी ५.०० लक्ष तरतुद अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु १८३ वर करण्यात आलेली आहे. त्याऐवजी पुंडलिक नगर १०० फुट डी.पी.रोडलगत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी सदरील तरतुद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७१ दुर्गामाता कॉलनी येथील ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु १५४ वर ३ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी सदरील तरतुद पश्चिम सोसायटी/दुर्गामाता कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेट रोड तयार करण्यासाठी वळती करण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.निमगांवकर प्रल्हाद, श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.७१ दुर्गामाता कॉलनी येथील ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु १५४ वर ३ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी सदरील तरतुद पश्चिम सोसायटी/दुर्गामाता कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेट रोड तयार करण्यासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हर्सुल गावामध्ये शिवाजी मैदानावर महानगरपालिकेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्री.मोहन मेघावाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,हर्सुल गावामध्ये शिवाजी मैदानावर महानगरपालिकेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.५१ इंदिरानगर, बायजीपुरा या प्रभागात **'आरोग्य केंद्र'** असणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या मध्यवर्ती जकात नाक्याचे शेजारी असलेले आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय अशी झालेली आहे. सदरील आरोग्य केंद्र इंदिरानगर प्रभागातील नागरीकांना दूर पडते. या परिसरातील चार वॉर्डाची लोकसंख्या जवळपास ४०-५० हजार असून इंदिरानगर प्रभागात एक आरोग्य केंद्र सुरू केल्यास याचा लाभ येथील नागरीकांना होईल. म्हणून या प्रभागात आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.कैलास गायकवाड

अनुमोदक :श्री.त्रिंबक तुपे,श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी,श्री.पुरूषोत्तम ठाकुर,श्री.प्रल्हाद निमागांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.५१ इंदिरानगर,बायजीपुरा या प्रभागात आरोग्य केंद्र सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे कडील निर्देश क्र.टी.पी.एस.३००५/९८७/प्र.क्र.१९४/२००५/नवि-३० दिनांक १५.४.२००६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये मंजुर विकास योजनेतील न.विकास भागात गॅस फिलींग स्टेशन/पेट्रोल पंम्प अनुज्ञेय करण्याचे तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणे बाबत. सदर अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. म्हणजेच महाराष्ट्र शासनाने मंजुर विकास योजनेतील संदर्भान्वये निर्देशात नमुद केलेल्या अटी व शर्तीला अधिन राहून गॅस फिलींग स्टेशन/पेट्रोल पंम्प यांना मान्यता देणे बाबत मान्य केलेले आहे.

या अनुषंगाने प्रस्तावीत करण्यात येते की, मौजे चिकलठाणा येथील गट नं ३९३ हे औरंगाबाद महानगरपालिका वाढीव हद्दीसाठी दिनांक १४/१०/१९९१ ला मंजुर झालेल्या विकास योजनेत ना विकास भागात असून सदर जागा राज्य रस्त्यावर असून या जागे पैकी श्री.गंगाधर भगवानराव जगताप

(पार्टनर श्री.राम ॲटो एल.पी.जी.पंम्प ) यांच्या एक एकर जागेत गॅस फिलींग स्टेशन/पेट्रोल पंप चा विकास करणे प्रस्तावित आहे.महाराष्ट्र शासनाने दिनांक १५.४.२००६ चा निर्देशातील सर्व अटींची पुर्तता होते. तरी सदर जागे मध्ये गॅस फिलींग स्टेशन/पेट्रोल पंप चा विकास करता यावा म्हणून शासनाचे वरील संदर्भीय निर्देशानुसार महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करून प्रस्तावीत गट नं.३९३ ची एक एकर जागा श्री.गंगाधर भगवानराव जगजाप यांची जागा गॅस फिलींग स्टेशन/पेट्रोल पंप मंजुर विकास योजनेत बदल करण्या करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर. तसेच सदर फेर बदलाची कार्यवाही जसे अधि सुचना प्रसिध्द करणे, सुचना हरकत मागवने, सुनवणी देणे, व प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी सर्व अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना प्रदान करणे करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या स्विकृती सह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.साहेबराव रानुबा कावडे, श्री.संतोष खेंडके पाटील

अनुमोदक : श्रीमती मिराबाई शिंदे, श्री.अनिल जैस्वाल,श्री.संजय केनेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मौजे चिकलठाणा येथील गट नं. ३९३ पैकी श्री.गंगाधर भगवानराव जगताप यांची १ एकर जमीन वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेत नाविकास क्षेत्रात असुन प्रस्तावात नमुद शासन निर्देशाप्रमाणे सदर जमीन नाविकास क्षेत्रातुन वगळून गॅस फिलींग स्टेशन /पेट्रोल पंपाच्या वापर बदलण्यास महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये मंजुर विकास योजनेत फेरबदल करण्यास तसेच सदर फेर बदलाची कार्यवाही जसे अधि सुचना प्रसिध्द करणे, सुचना हरकत मागवने, सुनवणी देणे, व प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी सर्व अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहराच्या मौजे मुस्तफाबादचे सर्वे नं.१ मधील जमीन सन १९७५ च्या मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षण क्रमांक ११९ खूली जागा प्रस्तावीत होती. त्या विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या कालावधीत या आरक्षणाचे भूसंपादन झालेले नाही. पुन्हा सन २००१ च्या मंजूर विकास योजनेत वरील जागा आरक्षण क्रमांक २९७ उद्यानासाठी दाखविण्यात आलेली आहे. सन १९७५ पासून आजपर्यंत ३१ वर्षाच्या कालावधी झाला तरी आरक्षणातील जागेचे भूसंपादन झालेले नाही आणि विकास करण्यात आलेला नाही.

जानेवारी १९९१ च्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्रमांक १४४/२ नुसार वरील आरक्षणातील भागश: जागा भीमगड मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी आरक्षणातून वगळण्यास मान्यता मिळालेली आहे. बाकीची आरक्षीत क्षेत्राने आरक्षणाचा उद्देश सफल होत नाही तसेच वरील जागा रेल्वे लाईन व नाल्याच्या मधील असल्याने महानगरपालिकेस त्याचा विकास करण्यास आवश्यकतेपेक्षा जास्त खर्च करावा लागेल. आरक्षण क्र.२९७ च्या उत्तरेस २९८ खेळाचे मैदान त्याच्या बाजूला आरक्षण क्र.३०१ गार्डनचे पुन्हा आरक्षण एकाच सेक्टरमध्ये तीन तीन गार्डनचे आरक्षण तांत्रिकदृष्ट्या योग्य वाटत नाही.

तरी वरील आरक्षणातील जागा वगळून रहिवाशी विभागात समाविष्ट करण्यास मान्यता द्यावी.

सुचक : श्री.हिम्मतराव दाभाडे

अनुमोदक : श्री.मधुकर सावंत,श्री.भगवान घडमोडे,श्री.कैलास गायकवाड,श्री.रविकांत गवळी,
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,१९७५ च्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ११९ खुली जागा व सुधारीत विकास योजनेत याच जागेत प्रस्तावित आरक्षण क्र. २९७ च्या उत्तरेस आरक्षण क्र.२९८ खेळाचे मैदान व आरक्षण क्र.३०१ उद्यान ही आरक्षणे वगळुन निवास भागात सामील करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिटीएस क्र.१७६८४/२ मोहल्ला सब्जीमंडी सिल्लेखाना या जमिनीचे एकुण क्षेत्रफळ २१६३७ चौ.मी. मधुन फक्त ५०×६० क्षेत्रफळ वगळुन म.न.पा. सर्व साधारण सभेच्या ठराव क्र.५४/1 दिनांक ३०.६.१९९७ व्दारे विकास योजनेत आराखड्यात वाचनालय आरक्षणातुन वगळण्यात आलेले आहे. सदरील ठिकाणी १००% टक्के वस्तीचा निर्माण झालेला आहे. व सध्या सदरील वस्तीतील नागरीकांच्या रहीवासासाठी वापरही आहे.

परंतु या सर्व जमिनीतून फक्त एकच प्लॉट ज्याचे क्षेत्रफळ ५०×६०/२ श्री.मोहम्मद युसूफ मो.अब्दुल रहीम यांचा असुन सदरील आरक्षणात आढळलेला आहे. एवढी मोठी जमिनीतून फक्त एकच प्लॉट वाचनालय आरक्षण क्र. एम.४० मध्ये उरलेला आहे. तरी सदरील प्लॉट ज्याचे क्षेत्र ५०×६० सि.टी.एस.क्र.१७६८४/२ मोहल्ला सब्जीमंडी सिल्लेखाना हे सि.टी.एस./आर.टी.पी.ॲक्ट १९६६ ची कलम ३७ अन्वये आरक्षणातुन वगळण्यात यावी.

सदर प्रस्ताव शासनाची मंजुरीस्तव सादर ही विनंती.

(टिप/ श्री.मोहम्मद युसूफ मो.अ.रहीम यांचे शेजारी सिटीजन प्रेस व रॉक्सी कॉम्प्लेक्स या दोघांची जागा वगळण्यात आलेली आहे.)

सुचक : श्रीमती नजमा युनुस कुरैशी अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मो.सब्जीमंडी सिल्लेखाना येथील सिटी सर्वे क्र.१७६८४/२ पैकी श्री.मोहम्मद युसुफ मोहम्मद अब्दुल रहीम यांची ५०×६०= ३००० चौरस फुट क्षेत्र आरक्षण क्र.४० वाचनालय या आरक्षणातून वगळुन निवास भागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास व परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.६ अंतर्गत येत असलेल्या साई क्रिडा संकुलात विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन होत असते. देशभरातून खेळाडू या ठिकाणी येत असल्याने पाण्याची कमतरता भासते. त्यामुळे या ठिकाणी हापसा बसविणे गरजेचे आहे. त्यासाठी नगरसेवक निधीतून विंधन विहिर देवून हापसा बसविण्या करीता व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.विनायक पांडे अनुमोदक :श्री.रेणुकादास वैद्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.६ अंतर्गत येत असलेल्या साई क्रिडा संकुलात नगरसेवक निधीतून विंधन विहिर देवून हापसा बसविण्या करीता व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,महानगरपालिकेची मोतीकारंजा भागातील शाळा ही विद्यार्थ्यांच्या आभावेमूळे महानगरपालिकेची दुसरी शाळा ''मॉडेल मिडेल'' या शाळेत ''मर्च'' करण्यात आले. या शाळेची भव्य इमारत गेल्या ५ ते ६ वर्षापासून रिकामी आहे. तरी महानगरपालिकेच्या शाळेची इमारत इतर शिक्षण संस्थेस भाडेतत्वावर देण्यात यावी.

तरी आपण वरील इमारत भाडेतत्वावर देण्यासाठी ठराव सर्वसाधारण सभेपूढे मंजूर करावा,ही नम्र विनंती.

सुचक : श्री.किशोर तुलशीबागवाले,श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेची मोतीकारंजा भागातील (मॉडेल मिडेल)शाळेची इमारत इतर शिक्षण संस्थेस भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७३६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.६ बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पा.नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-८३ | **शहरी भागात खूल्या गटारी बांधणे**<br>प्रभाग क्र.६ अंतर्गत फडणीस यांच्या घरामागील साचणाऱ्या सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याकरीता गटार बांधणे-२.०० लक्ष<br>... सदरील काम रद्द करणे. | वॉर्ड क्र.६ मधील छत्रपती शाहु महाराज समाज मंदिरामध्ये व्यायाम शाळेसाठी विविध कामे करणे.- २.०० लक्ष |

सुचक : श्री.विनायक पांडे अनुमोदक : श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वॉर्ड क्र.६ बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३७ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे हर्सूल येथील सर्वे नंबर १६७,१६९,१७०,१७२,१७३,१७९,१८० व १९१ इत्यादी जमिन औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार १५.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत असून एकूण बाधीत क्षेत्र अंदाजे १९४०० चौ.मी. आहे. त्यापैकी उक्त भागात अनेक रेखांकने मंजुर झालेली आहे. त्यानुसार रेखांकना अंतर्गत येणार उक्त १५.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याखालील अंदाजे क्षेत्र १०८०० चौ.मी. जागा सद्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. उर्वरीत क्षेत्र अंदाजे ८६०० चौ.मी. क्षेत्र भूसंपादन करावे लागेल. सदर भागात अनेक रेखांकनातील वस्त्या विकसीत झालेल्या असून त्यांना रस्ता उपलब्ध होण्यासाठी उक्त रस्ताने बाधीत क्षेत्राचे संपादन होणे आवश्यक आहे. जेणे करून नागरीकांना रस्त्याची सुविधा उपलब्ध होईल.

उक्त रस्त्याचे रूंदीकरणाचे आधुनिकीकरणाचे काम अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद या विभागामार्फत शासकीय अनुदानातून आय.आर.डी.पी. (I.R.D.P.) प्रोग्राम अंतर्गत हाती घेण्यात आलेले आहे. सदरील कामासाठी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद व मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी झालेली आहे. असे अतिरिक्त शहर अभियंता यांनी पत्राद्वारे कळविलेले आहे.

करीता बाधीत क्षेत्र संपादन करण्यासाठी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त आरक्षणाखालील क्षेत्र संपादन करण्यासाठी व त्यास लागणारा भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मौजे हर्सुल येथील स. नं.१६७,१६९,१७०,१७२,१७३,१७९,१८० व १९१ इत्यादी पैकी औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेच्या १५ मीटर रूंद रस्त्याने बाधीत असलेले व महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले क्षेत्र वगळता उर्वरीत सुमारे ८६०० चौ.मी.क्षेत्र रितसर भुसंपादन करण्यास व भुसंपादनासाठी येणाऱ्या खर्चासही सर्वानुमते मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७३८ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे पडेगांव येथील गट क्रमांक १४ पैकी मधील जमिन ३०.०० मीटर रूंद आणि १८.०० मीटर रूंद विकास योजनेतील प्रस्तावित असलेल्या रस्त्यात बाधित होत आहे. मिळकतीचे हितसंबंधीत श्री.तरविंदरसिंग महेंद्रसिंग धिल्लॉन यांनी वरील जमिनीमधील उक्त विकास योजना रस्त्यात बाधित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम -१९६६ चे कलम-१२७ नुसार दिनांक ११.०९.२००६ ला प्राप्त अर्जानुसार खरेदी सूचना दिलेली आहे.

औरंगाबाद शहराची (वाढीव हद्द) मंजुर विकास योजना सन १९९१ पासून अंमलात आलेली आहे. उक्त मंजुर विकास योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी दहा वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. वरील नमुद ३०.०० मीटर रूंद आणि १८.०० मीटर रूंद रस्ते उक्त मंजुर विकास योजनेनुसार प्रस्तावित आहे. उक्त अधिनियम-१९६६ चे कलम -१२७ मधील तरतूदीनुसार मंजुर विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या तारखेपासून दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने हित संबंधीतांनी उक्त कलम-१२७ नुसार बाधित क्षेत्रासाठी दिलेली खरेदी सूचना लागु होते. त्यानुसार अर्जदाराने दिलेली कलम -१२७ ची खरेदी सूचना लागू होत आहे. उक्त अधिनियमामधील तरतूदीनुसार खरेदी सूचना दिल्याच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ११.०९.२००६ पासून सहा महिन्यांच्या आत म्हणजेच दिनांक १०.०३.२००७ पूर्वी रितसर भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

गट क्रमांक १४/पैकी मौजे इटखेडा मधील हितसंबंधिताची एकूण जमीन १.६४ हेक्टर असून त्यामधील ३०.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात अंशत: बाधीत क्षेत्र अंदाजे १०५०.०० चौ.मी. आणि १८.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे अंदाजे क्षेत्र १४०० चौ.मी. अशा प्रकारे एकूण अंदाजे क्षेत्र २४५०.०० चौ.मी.बाधीत होत आहे. उक्त बाधीत क्षेत्राचा अंदाजे भूसंपादन खर्च रक्कम रूपये ७.३४ लक्ष येणार आहे.

करीता उक्त कलम-१२७ नुसार दिलेल्या बाधीत क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे पडेगांव येथील गट क्रमांक १४ पैकी मधील जमिन ३०.०० मीटर रूंद आणि १८.०० मीटर रूंद विकास योजनेतील प्रस्तावित असलेल्या रस्त्यात बाधित मिळकतीचे हितसंबंधीत श्री.तरविंदरसिंग महेंद्रसिंग धिल्लॉन यांनी बाधित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम -१९६६ चे कलम-१२७ नुसार खरेदी सूचना दिलेली असल्याने रितसर भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास तसेच हितसंबंधिताची एकूण जमीन १.६४ हेक्टर पैकी ३०.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्र अंदाजे १०५०.०० चौ.मी. आणि १८.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र अंदाजे क्षेत्र १४०० चौ.मी. अशा प्रकारे एकूण विकास योजना रस्त्याने बाधीत अंदाजे क्षेत्र २४५०.०० चौ.मी.रितसर भसुंपादन करण्यास व त्यास येणाऱ्या खर्चासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ७३९ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक ४२ पैकी मधील जमिन २४.०० मीटर रूंद आणि ६०.०० मीटर (पैठणरोड राज्य रस्ता) रूंद विकास योजनेतील प्रस्तावित असलेल्या रस्त्यात बाधित होत आहे. मिळकतीचे हितसंबंधीत श्री.तरविंदरसिंग महेंद्रसिंग धिल्लॉन यांनी वरील जमिनीमधील उक्त विकास योजना रस्त्यात बाधित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम-१२७ नुसार दिनांक ११.०९.२००६ ला प्राप्त अर्जानुसार खरेदी सूचना दिलेली आहे.

औरंगाबाद शहराची (वाढीव हद्द) मंजुर विकास योजना सन १९९१ पासून अंमलात आलेली आहे. उक्त मंजुर विकास योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी दहा वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. वरील नमूद २४.०० मीटर रूंद आणि ६०.०० मी. रूंद रस्ते उक्त मंजुर विकास योजनेनुसार प्रस्तावित आहे. उक्त अधिनियम -१९६६ चे कलम-१२७ मधील तरतुदीनुसार मंजुर विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या तारखेपासून दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने हित संबंधीतांनी उक्त कलम -१२७ नुसार बाधित क्षेत्रासाठी दिलेली खरेदी सूचना लागु होते. त्यानुसार अर्जदाराने दिलेली कलम-१२७ ची खरेदी सूचना लागू होत आहे. उक्त अधिनियमामधील तरतूदीनुसार खरेदी सूचना दिल्याच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ११.०९.२००६ पासून सहा महिन्यांच्या आत म्हणजेच दिनांक १०.०३.२००७ पूर्वी रितसर भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

गट क्रमांक ४२/पैकी मौजे कांचनवाडी मधील हितसंबंधीताची एकूण जमीन ६५७७.०० चौ.मी. असून त्यामधील २४.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात अंशत: बाधीत क्षेत्र अंदाजे १७५२.०० चौ.मी. बाधीत होत आहे. आणि ६०.०० मीटर रूंद रस्ता (अस्तित्वातील ३०.०० मीटर रूंद Highway रस्त्याच्या दोन्ही बाजुस प्रस्तावित १५.०० मीटर रूंद सेवा रस्ता (Service Road) मध्ये बाधीत अंदाजे क्षेत्र १३६०.०० चौ.मी. अशाप्रकारे २४.०० मीटर रूंद आणि ६०.०० मीटर रूंद रस्त्याचे एकूण अंदाजे बाधीत क्षेत्र ३११२.०० चौ.मी. आहे. उक्त बाधीत क्षेत्राचा अंदाजे भूसंपादन खर्च रक्कम रूपये २०.१८ लक्ष येणार आहे.

वरील रस्त्यापैकी ६०.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता हा अस्तित्वातील ३०.०० मीटर रूंद Highway राज्य रस्त्याच्या दोन्ही बाजुला प्रत्येकी १५.०० मीटर विकास योजनेमध्ये प्रस्तावित केलेली आहे. अशा प्रकारच्या १५.०० मीटर रूंद सेवा रस्त्याबाबत महानगरपालिकेच्या हद्दीसाठी मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम -३७ अन्वये

फेरबदल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मंजुर विकास योजनेत दर्शविलेले (State Highway/National Highway) लगतच्या १५.०० मीटर प्रस्तावित रूंदीकरणासाठी कोणत्याही प्रकारचा मोबदला कोणत्याही स्वरूपात देण्यात येणार नाही. या अटीस अधीन राहून तुर्तास वरील ६०.०० मीटर रूंदीने बाधीत जागेचा भूसंपादन प्रस्ताव पाठविणे योग्य.

करीता अर्जदाराने कलम-१२७ नुसार ६०.०० मीटर रूंदीकरणात बाधीत क्षेत्रासाठी दिलेल्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेतर्फे प्रस्तावित कलम-३७ अन्वये वरील नमुद फेरबदला बाबत जो निर्णय होईल, त्याप्रमाणे मोबदला देण्यात येईल या अटीवर उक्त रस्त्याच्या बाधीत क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव मान्य करणे योग्य होईल.

करीता उक्त कलम-१२७ नुसार दिलेल्या बाधीत क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक ४२ पैकी मधील जमिन २४.०० मीटर रूंद आणि ६०.०० मीटर (पैठणरोड राज्य रस्ता) रूंद विकास योजनेतील प्रस्तावित असलेल्या रस्त्यात बाधित होत आहे. मिळकतीचे हितसंबंधीत श्री.तरविंदरसिंग महेंद्रसिंग धिल्लॉन यांनी वरील जमिनीमधील उक्त विकास योजना रस्त्यात बाधित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम-१२७ नुसार दिनांक ११.०९.२००६ ला प्राप्त अर्जानुसार खरेदी सूचना दिलेली असल्याने रितसर भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास तसेच गट क्रमांक ४२/पैकी मौजे कांचनवाडी मधील हितसंबंधीताची एकूण जमीन ६५७७.०० चौ.मी. असून त्यामधील २४.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात अंशत: बाधीत क्षेत्र अंदाजे १७५२.०० चौ.मी. बाधीत होत आहे. आणि ६०.०० मीटर रूंद रस्ता (अस्तित्वातील ३०.०० मीटर रूंद Highway रस्त्याच्या दोन्ही बाजुस प्रस्तावित १५.०० मीटर रूंद सेवा रस्ता (Service Road) मध्ये बाधीत अंदाजे क्षेत्र १३६०.०० चौ.मी. अशाप्रकारे २४.०० मीटर रूंद आणि ६०.०० मीटर रूंद रस्त्याचे एकूण अंदाजे बाधीत क्षेत्र ३११२.०० चौ.मी. रितसर भूसंपादन करण्यास व त्यास येणाऱ्या खर्चासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४० :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहराचा वाढता व्याप, विस्तार व लोकसंख्यावाढीचे प्रमाण इत्यादी बाबी लक्षात घेता, शहरातील विकास करण्याच्या हेतूने शहरातील रस्त्यांचे नुतणीकरण, मजबुतीकरण व आधुनिकिकरण करणे अत्यंत क्रमप्राप्त झालेले आहे. या दृष्टीकोनातून विचार करता व महानगरपालिकेस करापासूनचे प्राप्त होणारे उत्पन्न लक्षात घेता व पालिकेचा खर्च लक्षात घेता, महानगरपालिकेला सद्यस्थितीत रस्त्यांचा विकास करणे करिता लागणारा मोठ्या प्रमाणावरील निधी महानगरपालिका स्वबळावर उभा करू शकत नाही, याकरिता महानगरपालिकेस विविध वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारणी करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहरातील व चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचे नुतणीकरण, मजबुतीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी अंदाजे रू.६०.०० कोटी कर्ज उभारणी करावी लागेल. सदरील कर्जाची परतफेडीकरीता महानगरपालिकेस नगर रचना विभागाकडून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे स्क्रो अकाऊंट रू.५०.०० कोटीसाठी व औद्योगिक वसाहतीमधून येणाऱ्या मालमत्ता कराचे स्क्रो अकाऊं रू.१०.०० कोटी कर्जासाठी कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थेत उघडण्यात येईल.

करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०९ नुसार रू.६०.०० कोटी कर्ज उभारणीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद शहरातील व चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचे नुतणीकरण, मजबुतीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०९ नुसार रू.६०.०० कोटी कर्ज उभारणीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ७४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको रामनगर एन-२ मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधणेचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००५-०६ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.३५,४३,३९१/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६२२ दिनांक १५.१२.२००७च्या उपलब्ध तरतुदीनुसार सन २००६-०७ या आर्थिक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते सिडको या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता सदरील कामाचे रक्कम रूपये ३५,४३,३९१/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको रामनगर एन-२ मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधण्याच्या कामाचे सा.बां.विभागाच्या सन २००५-०६ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.३५,४३,३९१/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येवून सदरील कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६२२ दिनांक १५.१२.२००७च्या उपलब्ध तरतुदीनुसार सन २००६-०७ या आर्थिक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते सिडको या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळेचे प्रस्ताव

**विषय क्र. ७४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, या, ऐतिहासीक शहराचे नागरिक व मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. यु.म. पठाण त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार दिला आहे. आपल्या शहराच्या दृष्टीने ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. आपल्या महानगरपालिकेच्या सभागृहात डॉ.पठाण सर त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात यावा. इतकेच नव्हे तर याच प्रबोधनकार ठाकरे सभागृहात महापालिकेच्या वतीने डॉ.पठाण सरांचा भव्य सत्कार करण्यात यावा. तसेच श्रीमती फातेमा झकेरीया यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवीले आहे त्यांचाही अभिनंदनाचा ठराव करावा ही विनंती.

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे      अनुमोदक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे,श्री.महेश माळवतकर,
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, या, ऐतिहासीक शहराचे नागरिक व मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. यु.म. पठाण व श्रीमती फातेमा झकेरीया

यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवीले आहे त्यांचा महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करून भव्य सत्कार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पुंडलिक नगर भागात पाणी पुरवठ्यांची दुसरी कुठलीही व्यवस्था नसल्याने उन्हाळ्यात पुंडलिक नगर वासायांची प्रचंड प्रमाणात गैरसोय होत आहे. तथापी या प्रभागातील नागरीकांची नैसर्गिक गरज लक्षात घेता येथे त्वरीत पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे.

तथापी या प्रकरणी गुंठेवारीचा एक हप्ता भरून घेऊन व अभय नळ योजनेचे १८०० रूपये भरून घेऊन पुंडलिक नगरला जलकुंभातून पाणी पुरवठा करण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, सौ.लता श्रीनिवास दलाल, श्री.रेणुकादास (राजु) वैद्य

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.भगवान घडमोडे,श्री.शशांक विसपुते

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुंडलिक नगर प्रभागात पाणी पुरवठ्याची दुसरी कुठलीही व्यवस्था नसल्याने सदरील प्रकरणी गुंठेवारीचा एक हप्ता व अभय नव योजनेचे १८०० रू.भरून घेऊन जलकुंभातुन पाणी पुरवठा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४४ :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत जळगांव रस्ता नागपूर पॅटर्न प्रमाणे विकसीत करण्याचे काम चालू आहे सदर रस्त्याच्या मध्यापासुन १५ मीटर मध्ये येणाऱ्या मुख्य जलवाहिन्या व उप जलवाहिन्या स्थलांतरीत कराव्या असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कळविले आहे त्यानुसार एन-५ पाणपोई पासुन ते जळगांव टी पॉईंट पर्यंत विविध व्यासाच्या मुख्य जलवाहिन्या १५ मीटरमध्ये बाधीत होत असल्याने एन-५ पाणपोईपासुन ते देवगीरी बँक सिडको पर्यंत एकुण लांबी १३०० मीटर अस्तित्वातील ३०० मी.मी.व्यासाची सी.आय जलवाहिनी स्थलांतरीत करणे तसेच एन-७ जलकुंभापासुन ते एन-११ पर्यंत ४०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी स्थलांतरीत करणे शक्य होत नाही. करीता तेथे नवीन ४०० मी.मी डी.आय. जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे आंबेडकर नगर व जाधववाडी येथील २०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी स्थलांतरीत करणे शक्य होत नाही करीता तेथे नवीन २०० व १५० मी.मी. व्यासाची डी.आय.जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे. याकरीता र.रू.९७.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

करीता वरील सर्व कामाकरीता एकुण अंदाजपत्रक ९७.०० लक्षचे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागपुर पॅटर्न नुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे जळगांव रस्ता विकसीत करण्याचे काम चालू असुन सदर रस्त्याच्या मध्यापासुन १५ मीटरमध्ये एन-५ पाणपोई पासुन ते देवगीरी बँक सिडको पर्यंत अस्तित्वातील ३०० मी.मी.व्यासाची सी.आय. जलवाहिनी स्थलांतरीत करणे व एन-७ जलकुंभा पासुन एन-११ पर्यंत अस्तीत्वात असलेली ४०० मी.मी.व्यासाची एसी. जलवाहिनी व १५० व २०० मी.मी.व्यासाची एसी.उप जलवाहिनी स्थलांतरीत करणे शक्य नसल्यामुळे त्याऐवजी ४०० मी.मी.व्यासाची डी.आय.के. आणि १५० व २०० मी.मी.व्यासाची नवीन डी.आय.के लाईन टाकणेच्या कामासाठी र.रू.९७.०० लक्षच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की झाल्टा येथे महानगरपालिकेतर्फे सिव्हेज ट्रिटमेंट प्लाँटची उभारणी करण्यात आली आहे. सदर प्लँटपर्यंत सिव्हर एम या मुख्य जलनिसा:रण वाहिनीव्दारे सुखना नदीच्या खोऱ्यात येणाऱ्या वसाहतीचे ड्रेनेजचे पाणी पोहचविणे आणि त्यावर प्रक्रिया करून पुन्हा नदीत सोडणे यासाठी हा सिव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्ट उभारण्यात आला आहे. तथापी या प्लँन्ट पर्यंत सध्या पाणीच पोहचत नाही.

साधारण वर्ष १९९२ -९३ मध्ये SEWER एम चे काम करण्यात आले असुन हे काम पुर्ण झाल्यानंतर आजुबाजूचे शेती करणारे,विटभट्ट्या चालवणारे इत्यादी घटकाकडून सदर ड्रेनेज लाईनचे नुकसान झाले आहे. जागोजागी ड्रेनेज चेंबर तोडले असुन,ड्रेनेज लाईनही तोडली आहे. त्यामुळे झाल्टा सिव्हर ट्रिटमेंट प्लॅन्ट पर्यंत पाणी पोहचत नाही पर्यायाने नाल्यात ड्रेनेज लाईनचे घाण पाणी उघड्यावर वाहिल्यामुळे जमीनीखालील पाण्याचे प्रदुषण होत आहे. त्यावर उपाय म्हणून सदर ड्रेनेज लाईनचे काम पिसादेवी रोड ते झाल्टा ट्रिटमेंट प्लॅन्ट पर्यंत नव्याने करणेसाठी अंदाजपत्रक र.रू.२,१७,०५,५००/- (रूपये दोन कोटी सतरा लक्ष पाच हजार पाचशे मात्र)चे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे.

सदर काम झाले नंतर आजुबाजुचे नागरीक ,शेतकरी, विटभट्टयावाले इत्यादी यांनी ड्रेनेज लाईन फोडू नये म्हणून दक्षता घेण्यात येईल आणि जे घटक ड्रेनेज लाईनचे नुकसान करतील त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल तसेच यापुर्वी झालेल्या सिव्हर एम आणि झाल्टा ट्रिटमेंट प्लॅन्टच्या कामाची सखोल चौकशी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून किंवा सक्षम प्राधिकरणाकडून करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र.रू.२,१७,०५,५००/- चे मान्यतेस्तव सादर. सदर कामासाठी अंदाजपत्रिकेय तरतुद (आर्थिक वर्ष २००६-०७ च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये)उपलब्ध नाही तथापी काम करणे आवश्यक असल्यामुळे यावर्षी सिडको भागातील सिव्हर ट्रिटमेंट प्लॅन्ट साठी ठेवलेल्या रू.१००.०० लक्ष या तरतुदी मधुन रू.५०.०० लक्ष या कामासाठी वळती करणेचा प्रस्ताव आहे तसेच उर्वरीत र.रू.१,६७,०५,५००/- आर्थिक वर्ष २००७-०८ च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये तरतुद करून उपलब्ध करून देण्यात येईल. अशा प्रकारे एकुण रू.२,१७,०५,५००/- चे काम करण्यात येईल तसेच काम करण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करून काम करण्यात येईल जेणे करून योग्य प्रकारे काम होईल.तसेच फक्त म.जी.प्रा. कडे नोंदणी केलेल्या ठेकेदारांनाच निविदा विक्री करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र.रू.२,१७,०५,५००/- चे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,झाल्टा येथे महानगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या सिव्हेज ट्रिटमेंट प्लांट (S.T.P)पर्यंत (पिसादेवी रोड ते झाल्टा ट्रिटमेंट प्लांटपर्यंत )मुख्य जलनि:सारण वाहिनी टाकण्यास व अंदाजपत्रक रूपये २,१७,०५,५००/- ला खालील अटीवर मंजुरी देण्यात येते.

१. आर्थिक वर्ष २००६-०७ मधील अर्थसंकल्पीय पुस्तीकेतील सिडको येथील सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांटसाठी ठेवण्यात आलेल्या रूपये १००.०० लक्ष तरतुदीपैकी रूपये ५०.०० लक्षची तरतुद प्रस्तावात दर्शविलेल्या सिव्हर 'एम' च्या कामासाठी वळविण्यात यावी.

२. उर्वरीत लागणारी रूपये १,६७,०५,५००/- ची तरतुद आगामी अर्थसंकल्पात (वर्ष २००७-०८)करण्यात यावी.

३. नव्याने करण्यात येणारे सिव्हर 'एम' या मुख्य जलनि:सारण वाहिनीचे काम तांत्रिक दृष्ट्या योग्य प्रतीचे होण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट यांची नेमणूक करून काम करावे व निविदा काढताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे योग्य वर्गात नोंदणी केलेल्या ठेकेदारांनाच निविदा विक्री करावी, जेणे करून अनुभवी कंत्राटदार उपलब्ध होतील.

४. पूर्वी करण्यात आलेल्या सिव्हर 'एम'आणि झाल्टा ट्रिटमेंट प्लांटच्या कामाची चौकशी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून करण्यात यावी.

५. नव्याने काम झाल्यानंतर विट भट्टीवाले, आजुबाजुचे शेतकरी,नागरीक यांनी ड्रेनेज फोडून पाणी वापरू नये यासाठी प्रशासनाने खबरदारी घ्यावी आणि सार्वजनिक मालमत्तेस नुकसान पोहचविणाऱ्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.२,१७,०५,५००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८२ भारतनगर, मातोश्री नगर गारखेडा येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे. च्या कामाचे अंदाजपत्रक सन २००५-०६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रक र.रू.२,३७,६००/- होत आहे. सदरील काम महाराष्ट्र शासनाच्या नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.पूरक/विधयो/१०२००६/ प्र.क्र. १२/२००६/नवि-४/ मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक ३१ मार्च,२००६ सहपत्रावरील अ.क्र. १२४ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेस उपलब्ध झालेल्या र.रू. १६७.५४ लक्ष तरतुदीतून प्रस्तावीत आहे.

अ.प.रक्कम रू.२,३७,६००/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,भारतनगर, मातोश्री नगर गारखेडा येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे. च्या कामाचे र.रू.२,३७,६००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्रमांक-१९ मधील रायगडनगर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात बाल शिवाजी आणि राजमाता जिजाऊ यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे तसेच संत तुकाराम सभागृहाच्या नामफलकाच्या कमानीवर संत तुकाराम महाराज यांचा बैठा पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल अनुमोदक : श्री. संजय जगताप, श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्रमांक-१९ मधील रायगडनगर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात बाल शिवाजी आणि राजमाता जिजाऊ यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे तसेच संत तुकाराम सभागृहाच्या नामफलकाच्या कमानीवर संत तुकाराम महाराज यांचा बैठा पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद